बुधवार, २४ एप्रिल २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २३८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 24 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-238 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-8 ●PRICE-05



# जनतेची लूट करण्याचा कट उधळल्याने काँग्रेस हादरली!

## राजस्थानातील सभेत पंतप्रधान मोदींचा घणाघात

आधुनिक केसरी न्यूज

**सवाई माधोपूर : जनतेची संपत्ती हिसकावून त्यांच्या विशेष लोकांमध्ये वाटून घेण्याचा काँग्रेसचा कट उघड केल्यामुळे संपूर्ण काँग्रेसमध्ये खळबळ उडाली असून आता काँग्रेस माझ्याविषयी अपशब्द वापरत आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी टोंक-सवाई माधोपूर (राजस्थान) येथे आयोजित एका विशाल जाहीर सभेत बोलताना केला. काँग्रेसला सत्याची भीती वाटत असून छुपा अजेंडा उघड झाल्याने हादरलेली काँग्रेस आपली धोरणे लपवण्याचा प्रयत्न करत आहे का, असा सवाल करत त्यांनी काँग्रेस वर नवा हल्ला चढविला.**

व्होट बँक राजकारणाच्या दलदलीत बुडालेल्या काँग्रेसला बाबासाहेबांच्या राज्यघटनेचीही पर्वा नाही. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात जनतेच्या मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याची भाषा केली असताना, त्यांचा एक नेता तर देशाचा एक्स-रे करण्याची भाषा करत आहे. काँग्रेस आणि इंडी आघाडी सत्तेत असताना त्यांना दलित आणि मागासवर्गीयांच्या आरक्षणात घुसखोरी करून त्यांच्या खास व्होटबँकेला आरक्षण द्यायचे होते, तर राज्यघटना याच्या पूर्णपणे विरोधात आहे, असा घणाघातही त्यांनी केला. बाबासाहेबांनी दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींना दिलेला आरक्षणाचा अधिकार काँग्रेस आणि इंडी आघाडीला धर्माच्या आधारावर मुस्लिमांना द्यायचा होता. काँग्रेस दलित आणि मागास विरोधी असल्याचा आरोप करत त्यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला.

एक स्थिर आणि प्रामाणिक सरकार देशाच्या विकासासाठी काय करू शकते हे गेल्या 10 वर्षांत देशाने पाहिले आहे, असे मोदी म्हणाले. भारत आज जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. गेल्या 10 वर्षांत देशातील 25 कोटी जनता दारिद्र्यरेषेतून बाहेर आली आहे. मतदारांच्या अचूक मतदानामुळे देशात अशी मोठी कामे झाली आहेत. भाजपा सरकारच्या काळात गरिबांना मोफत रेशन मिळाले, कायमस्वरूपी घर मिळाले आणि त्यांची चूल जळत राहिली आहे. 2014 मध्ये देशातील जनतेने मोदींना दिल्लीत सेवा करण्याची संधी दिली, त्यामुळे देशाने अकल्पनीय निर्णय घेतले. 2014 नंतरही काँग्रेस सत्तेत असती तर जम्मू-काश्मीरमध्ये सैन्यावर दगडफेक झाली असती, शत्रूंनी सीमेपलीकडून येऊन आमच्या जवानांचा शिरच्छेद केला असता आणि काँग्रेस सरकारने काहीही केले नसते. काँग्रेसची सत्ता असती तर वन रँक वन पेन्शन लागू झाली नसती, माजी सैनिकांना 1 लाख कोटी रुपये मिळू शकले नसते आणि देशात बॉम्बस्फोट सुरूच राहिले असते. राजस्थानमध्ये बॉम्बस्फोट घडवणाऱ्यांना संरक्षण देण्याचे घोर पापही काँग्रेसने केले आहे. काँग्रेसचे सरकार असते तर कोरोनाच्या काळात कोणालाही मोफत रेशन किंवा लसीचे मोफत डोस मिळाले नसते आणि देशात महागाईची ओरड झाली असती, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

मोदी म्हणाले की, काँग्रेसने संविधानाशी खेळण्याचा प्रयत्न केला. संविधान बनवताना धर्मावर आधारित आरक्षणाला तीव्र विरोध होता, पण माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी नेमके उलटे केले होते. त्यांचे हे विधान कोणापासून लपून राहिलेले नाही, ज्यात त्यांनी सांगितले की, देशाच्या साधन संपत्तीवर पहिला अधिकार कोणाचा आहे? हा योगायोग नव्हता, काँग्रेसची विचारसरणी नेहमीच तुष्टीकरणाची राहिली आहे.

# नाशिक लोकसभेवरचा दावा सोडलेला नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ट नेते छगन भुजबळ यांनी लोकसभा निवडणूकीत उमेदवारी माघारी घेतलेली असली तरी राष्ट्रवादी काँग्रेसने नाशिक लोकसभेवरील दावा सोडलेला नाही. अशी माहिती राष्ट्रवादीचे प्रवक्ते माजी खासदार आनंद परांजपे यांनी पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रवादीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते ब्रिजमोहन श्रिवास्तव, अविनाश आदिक, संजय तटकरे आणि मुंबईचे कार्याध्यक्ष नरेंद्र राणे उपस्थित होते.

# वीरयोद्धा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत रांजणकर यांना दै. आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज


**सचिन चांडक**

**लातूर :** वीरयोद्धा संघटनेच्या माध्यमातून श्रीकांत नंदकिशोर मीराबाई रांजणकर यांनी अत्यंत कमी वयात सामाजिक कार्यात मोठी उंची गाठत समाजमनात आगळावेगळा ठसा उमटवला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सबका साथ, सबका विकास ही संकल्पना राबवत देशविकासाला चालना दिली. याच भूमिकेला पूरक असे श्रीकांत रांजणकर यांचे कार्य आहे. सतत सामाजिक कार्यात रमणारे, लोकांचे प्रश्न तेवढ्याच तत्परतेने सोडवणारे आणि अडल्या-नडलेल्यांना मदत करतानाच अन्यायाविरोधात खंबीरपणे उभे राहून पीडितांना न्याय देणारे आणि घरात कुठलाही सामाजिक, राजकीय वारसा नसताना वीरयोद्धा या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून केवळ लातूर शहर, जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण राज्यात आपल्या कार्याची पताका फडकवणारे धडाडीचे युवा कार्यकर्ते म्हणून श्रीकांत रांजणकर ओळखले जातात. संघटन कौशल्य, सोबत युवकांची सक्षम फळी आणि सर्वसामान्यांसाठी धावून येणारे कृतिशील युवा नेतृत्व म्हणून ते परिचित आहेत. दैनिक आधुनिक केसरीने श्रीकांत मीराबाई नंदकिशोर रांजणकर यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर केला आहे.



श्रीकांत रांजणकर यांनी आयुष्याच्या वळणावर जीवनाचे मूल्यमापन करताना पाठीमागे वळून पाहिल्यावर आपल्या आयुष्याचे नेमके ध्येय काय, याचा मागोवा घेतला. तेव्हा समाजाचे उत्थान झाल्याशिवाय उपाय नाही, हे ब्रीद आणि समाजोत्थानाचा महामार्ग राजकारणातूनच जातो, हे वास्तव मनोमन पटले. त्यामुळे लहान-मोठ्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक चळवळींशी बांधून घेतले. कुटुंबात कोणताही सामाजिक-राजकीय वारसा नसताना प्रत्येक लहानातल्या लहान कार्यकर्त्यांकडून आदर्श शिकण्याचा श्रीकांत रांजणकर यांनी प्रयत्न केला. मोठ्यांकडून अनुकरण आणि आदर्श विचारांची शिदोरी मिळवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. केलेल्या कामांना वरिष्ठांनी दिलेली शाबासकीची थाप, माझ्यात ऊर्जेचा नवा स्रोत निर्माण करते. त्यामुळे माझ्या पंखात नवे बळ संचारते आणि आणखी मोठ्या जनसमूहाच्या समस्यांची सोडवणूक करून त्यांच्या जीवनातील आशा, अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब माझ्या राजकीय, सामाजिक कार्यातून सफल होऊ दे अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करीत असतो, असे श्रीकांत रांजणकर सांगतात. माझ्या जिल्ह्यातील सर्व स्तरातील समाज मला भरभरून सहकार्य आणि प्रोत्साहन देतो. त्याबाबत मी त्यांचा कायम ऋणी आहे. याच पाठबळाच्या जोरावर मी सामाजिक कार्यासोबत राजकीय भूमिकेतून समाजाची सेवा करू इच्छितो. त्याच दृष्टीने पुढील वाटचाल करण्याचा निश्चय केला असे श्रीकांत रांजणकर सांगतात.

आतापर्यंत श्रीकांत रांजणकर यांना पेशवा युवा संघटनेच्या वतीने आदर्श युवा पुरस्कार 19 सप्टेंबर 2014, संस्थापकाचार्य ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभूपाद इस्कॉनच्या वतीने - गोरक्षक पुरस्कार 2015, सप्तफेरे वधुवर सूचक केंद्रच्या वतीने सेवा पुरस्कार 2018, राजयोग चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्यच्या वतीने- समाजभूषण पुरस्कार - 2019, महाराष्ट्र विद्यार्थी गर्जना लातूर जिल्ह्याच्या वतीने शिवभूषण पुरस्कार - 2019, विद्यार्थी हक्क कृती समितीच्या वतीने - माणुसकीचे दर्शन पुरस्कार -28 जून 2021, अक्का फाउंडेशनच्या वतीने - कोरोना योद्धा पुरस्कार 2021, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती - समाजसेवा पुरस्कार - 2021, डी स्टार डान्स स्टुडिओच्या वतीने- समाजरत्न पुरस्कार 2024 भालचंद्र ब्लड बँक, सह्याद्री ॲक्सिडेंट अँड न्युरोकेअर सेंटर, साई क्रिटीकेअर हॉस्पिटल, संजीवनी ब्लड बँक गौरव चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले आहे.




श्रीकांत रांजणकर 2010 पासून राजकीय-सामाजिक आंदोलनात सक्रिय आहेत. मुंबईवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या 26/11 च्या हल्ल्यातील आरोपींना तत्काळ फाशी द्या, या मागणीसाठी ठिकठिकाणी लक्षवेधी आंदोलने करून सदर मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला. आरोपी असलेल्या कसाब या अतिरेक्याला फाशीची शिक्षा झाल्यानंतर नागरिकांमध्ये जाऊन विजयी सभांचे आयोजन करून न्यायालयाचे आभार मानले. राज्यात गोवंश व गोहत्या बंदी कायदा लागू करावा, यासाठी सरकारसोबत एका बाजूला सातत्याने पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला तर त्याच वेळी गावोगावी जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधला आणि आठवडी बाजारात जनजागृतीसाठी आंदोलने केली.

2013 मध्ये काँग्रेसचे रशीद मसूद यांनी 5 रुपयांत पोटभर जेवण मिळू शकते, असे म्हटले होते. त्यानंतर काँग्रेसचे प्रवक्ते राज बब्बर यांनीही देशात कुठेही 12 रुपयांत पोटभर जेवण मिळते, असे म्हणत गरिबांची कुचेष्टा केली होती. तेव्हा लगेचच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना 12 रुपयांत पोटभर जेवण सरकारने पुरवावे, या मागणीसाठी यूपीए सरकारच्या काळात लातूर काँग्रेस भवनवर भव्य मोर्चा काढला.

श्रीकांत रांजणकर यांनी जिल्ह्यात गोवंश हत्याबंदीसाठी मोठे कार्य उभारले. याच कार्याचा भाग म्हणून गोवंशाची होणारी संभाव्य कत्तल यशस्वीपणे रोखून 2008 पासून तब्बल 7000 जनावरांचा जीव वाचवला. यासोबतच गोशाळा सुरू करून गोवंशांची सेवाही सुरू ठेवली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धांचे आयोजन करून कुस्तीपटूंना प्रोत्साहन देण्याचे काम केले. या माध्यमातून 1 हजारपेक्षा जास्त खेळाडूंसोबत वैयक्तिक संपर्क आणि समन्वय साधण्याचे काम केले. लातूर जिल्ह्यात रक्तदान चळवळही व्यापक प्रमाणात राबवली. 2010 पासून आतापर्यंत 30 पेक्षा जास्त रक्तदान शिबिरे आयोजित करुन रक्तदानाचे महत्कार्य केले. यातून 3000 पेक्षा अधिक तरुणांसोबत बांधणी केली आणि रक्तदानातून अनेकांचे जीव वाचवण्यास मदत झाली. आदर्श युवक निर्माण शिबिरांच्या आयोजनातून तब्बल 1000 तरुणांची फळी उभी केली. सन 2015 पासून 'बेवारस मयतांचे अंत्यविधी अभियान'च्या माध्यमातून 100 पेक्षा जास्त लोकांचे अंत्यविधी केले. यासंदर्भात पोलिस प्रशासनामार्फत रितसर कळविल्यानंतर सर्व प्रक्रिया पूर्ण करून अंत्यविधी केला जातो. तसेच गरजूंना मदतही केली.

ग्रामीण रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रियेच्या माध्यमातून दहा खेडी अभियान राबवले. या माध्यमांतून अनेक गावांत अभियान राबवून तब्बल 5000 पेक्षाही अधिक रुग्णांवर उपचार केले. यातून 5 हजारांवर कुटुंबीयांशी ते कायमचे जोडले गेले. त्यांनी घेतलेल्या समाजकार्याचा वसा ते आयुष्यभर पुढे नेतील, अशी ग्वाही श्रीकांत रांजणकर यांनी यावेळी दिली. श्रीकांत रांजणकर यांचे हे कार्य निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या या वेगळ्या वाटेवरील प्रवासाबद्दल आधुनिक केसरीने त्यांना समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार घोषित केलेला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या सन्मान सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल समाजातील विविध स्तरांतून श्रीकांत रांजणकर यांचे अभिनंदन होत आहे.

# शेणखत शेतीसाठी वरदान : शेतकऱ्यांनी शेणखताचा वापर करून विषमुक्त शेतीकडे वळावे

आधुनिक केसरी न्यूज


**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** शेणखत हा शेतीचा आत्मा असून त्याचे अनेक फायदे असल्याने शेतकऱ्यांनी शेणखताचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे.परंतु शेणखताचा वापर हा नामशेष होण्याच्या मार्गावर असून आरोग्याच्या दृष्टीने जैविक शेतीकडे वळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सखाराम महाराज गोरक्षण चे अध्यक्ष कल्याण महाराज यांनी केले आहे. शेणखतामधून पिकांना अन्नद्रव्यांचे मिळणारे प्रमाण रासायनिक खतांच्या तुलनेत अत्यल्प असला तरीही



मात्र शेणखतात सेंद्रिय पदार्थांचा अंतर्भाव जास्त असल्यामुळे सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण जमिनीत तयार होते. परिणाम खुप चांगले दिसतात. त्यामुळे जमिनीत अन्नद्रव्ये उपलब्ध करण्यास मदत करणारे जिवाणू जसे ॲझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळवण्यास मदत करणारे जिवाणू इ. इतर सूक्ष्मजीवांच्या संख्येत लक्षणीय वाढ होते. गांडुळांचा जमिनीतील वावर वाढतो. जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.शेणखताच्या नियमित वापरामुळे जमिनीच्या कणांच्या रचनेत बदल होऊन भौतिक गुणधर्मांमध्ये लक्षणीय बदल होतात. जमिनीतून वापरण्यात येणारे जैविक-कीड-रोगनाशके जसे ट्रायकोडर्मा, सुडोमोनास, पॅसिलोमायसिस, बिव्हेरिया, मेटारायझियम आणि जैविक खते जसे ॲझोटोबॅक्टरसह इतर अन्नद्रव्ये उपलब्ध करून देणाऱ्या जिवाणूंची वाढ नैसर्गिक पद्धतीने होण्यास मदत होते. जमिनीतील मुळांच्या कार्यक्षेत्रातील श्वसन वाढून मुळांद्वारे संश्लेषित करण्यात येणाऱ्या संजीवकांची निर्मिती चांगल्या प्रकारे होते. पांढऱ्या मुळींची वाढ जोमदार होऊन पीक संपूर्ण हंगामात निरोगी असते.त्यामुळे शेणखताचे अनन्य साधारण महत्व असून प्रत्येक शेतकऱ्याने गाय,बैल,मैस आदी जनावरे पाळून त्या पासून मिळणारे शेणखत आपल्या जमिनीमध्ये वापरून रासायनिक खतांचा बेसुमार वापर थांबवावा. रासायनिक खतांच्या अती वापराने हल्ली कर्करोगासारख्या अनेक असाध्य रोगांनी मानवी जीवन संपवण्याचा घाट घातला आहे. रासायनिक खतांचा वापर थांबवणे गरजेचे आहे. अन्यथा येणाऱ्या काळात शेतजमिनी उजाड झाल्या शिवाय राहणार नाहीत.

> उत्पन्न वाढीसाठी हल्ली रासायनिक खतांचा अती वापर वाढला असून शेतकरी तांत्रिक पद्धतीने शेती कडे वळल्याने शेणखताचा वापर हा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे सखाराम महाराज गोरक्षण प्रतिष्ठान लोणी येथे जवळपास 200 हून अधिक गायी असून यापासून मिळणारे दूध संस्थांनसाठी वापरण्यात येते तर शेणखत, गोमूत्र हे शेतीसाठी वापरण्यात येते प्रत्येक शेतकऱ्याने जनावरे पाळणे आवश्यक आहे . **कल्याण महाराज जोशी**, अध्यक्ष सखाराम महाराज गोरक्षण प्रतिष्ठान लोणी





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी





कधी कधी सामान्य व्यक्तीतही असामान्यत्वाचे दर्शन घडते. फक्त आपल्याजवळ ते पाहण्याची दृष्टी हवी. तुमच्या माझ्यासारख्या सुशिक्षित माणसांना पुस्तकं वाचता येतात. पण समोरचा माणूसही वाचता यायला हवा. त्यासाठी आपले नेहमीचे चष्मे बाजूला काढून ठेवावे लागतात. आपल्याला सवय असते ती आपल्या एका ठरविक मोजपट्टीतून माणसं मोजण्याची. त्यात जो बसला, तो चांगला. त्यात न बसणारी व्यक्ती आढळली की आपल्याला ती व्यक्ती खटकते. मी बऱ्याच वेळेला माझे पूर्वग्रह बाजूला ठेवतो. एका भेटीत किंवा अगदी दोनचार भेटीतही एखादी व्यक्ती आपल्याला कळतेच असे नाही. त्यासाठी काही ठराविक काळ जावा लागतो. मग अशा व्यक्तींच्या स्वभावाचे कंगोरे, गुणदोष आपल्याला कळत जातात.

आम्ही चाळीसगावला नवीन घरात राहायला आलो, तेव्हाची गोष्ट. आता साधारणपणे वीस वर्षे झाली असतील. आमच्या घरासमोर छोटीशी बाग करण्यासाठी पुरेशी मोकळी जागा होती. मला आणि आमच्या सौभाग्यवतीला बागेची फार आवड. त्यामुळे आम्ही ती मोकळी जागा बागेसाठी वापरायची असे ठरवले. सुरुवातीला मोठया हौसेनं वेगवेगळी झाडं लावत गेलो. काही चांगली वाढली. काही जगली नाही. खरं तर बाग विकसित करायची तर ती नियोजनबद्ध रीतीने करायला हवी. बागच काय पण जीवनातील अनेक गोष्टी करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते. आमच्या घरासमोरच एक मोठा बंगला होता. त्या बंगल्याच्या पुढील विस्तीर्ण भागात सुंदर बाग होती. पाठीमागे घर होते.



## हितगुज

पुष्प ४७वे




गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## जे शीलवान ते सुंदर

भारतीय समाजाने शील, उत्तम चारित्र्यास नेहमी अधिक महत्त्व दिले आहे. अंतःकरण तेजस्वी, उज्ज्वल करणाऱ्या गायत्री मंत्राचा पाया शुद्ध, निर्मळ चारित्र्य आहे. "ओम भुर्भूवः स्वः ततसवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात" आत्मज्ञानाचा प्रकाश उजळण्याची व अज्ञान, भ्रम, मायेने प्रभावित अज्ञानाचा अंधार नाहीसा करण्याची सदिच्छा भारतीय साहित्यात वेगवेगळ्या रूपाने नित्य व्यक्त झाली आहे. ज्ञानाची सुंदर पहाट होण्यासाठी भाव, इच्छा, बुद्धी, विचार, आकांक्षा, श्रद्धा, कल्पना आदी बद्ध, विशाल, निःस्वार्थी, पवित्र, समदर्शी असणे आवश्यक आहे. यातूनच तापलेल्या सुवर्णाप्रमाणे धगधगीत शील, चारित्र्य साकार होते. मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचे उच्चतम रूप भावविचारांची स्नेहासीक्त भास्वरता आहे. 'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे हो तु।' सज्जनांचे असे सोयरपण सहजपणे अनुभवण्यासाठी अध्यात्म व मानवता, संस्कार व नीतिमूल्ये भारतीय जीवनात नित्य अधिष्ठित आहेत. प्रत्येक आईवडील मुलामध्ये श्रीरामाचे मर्यादापूर्ण धीरगंभीर, धीरोदात्त रूप बघण्यासाठी आसुसलेले असतात. तर प्रत्येक भारतीय कन्या ही सीता-सावित्रीचे उदात्त, पवित्र रूप असते. ही पवित्रता ज्या त्यागातून, सहनशीलतेतून, पावित्र्यातून प्रकट होते, हे सर्व शील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत म्हणून भारतीय सौंदर्यबोध मूलभूत उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे -
नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्यांचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४



## आनंदी पहाट

## पैशाचा परिणाम आपल्या विचार व वर्तनावर होतोच

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सध्याच्या युगात, मोठी घरे, चांगल्या कार आणि आलिशान वस्तू खरेदी करण्यासाठी अधिकाधिक पैसे कमावण्याच्या शर्यतीत आपण कधी आणि कसे आडकत जातो तेच कळत नाही. तथापि, दिवसाच्या शेवटी, आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे पुरेसे पैसे नसल्यास, आपण जगण्यासाठी संघर्ष करू. ह्यादृष्टीने जगण्यासाठी कमाईचे मानसशास्त्र सोपे आहे.
आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पुरेसे पैसे मिळवण्यासाठी काम करतो. हा जीवनाचा एक आवश्यक भाग आहे; ज्याकडे मोठ्या आणि चांगल्या व्यक्तींकडून देखील दुर्लक्ष केले जाते. जगण्यासाठी पैशाशिवाय, आपण आपली पूर्ण क्षमता साध्य करू शकत नाही किंवा परिपूर्ण जीवन जगू शकत नाही. स्वातंत्र्यासाठी लागणारा पैसा म्हणजे आपण जगण्यासाठी आवश्यक त्यापेक्षा जास्त पैसे कमावणे होय. पैसा हा जीवनाचा अत्यावश्यक पैलू आहे. हे देवाणघेवाण करण्याचे साधन आणि मूल्याचे प्रतीक आहे. प्रचलित म्हणीप्रमाणे पैसा जगाला प्रदक्षिणा घालतो. तथापि, पैशाचे मानसशास्त्र त्याच्या आर्थिक मूल्याच्या पलीकडे जाते. पैशाचा आपल्या श्रद्धा, भावना आणि वर्तनावर परिणाम होतो. एक माणूस म्हणून, आपल्या कमाईच्या क्षमतेचा थेट आपल्या जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो आणि आर्थिक काळजी न करता आपल्याला हवे ते करण्याचे स्वातंत्र्य मिळू शकते. आपण जगण्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी कमाईचे मानसशास्त्र तसेच त्याचा आपल्या एकूण कल्याणावर कसा परिणाम होतो; हे शोधू शकलो पाहिजे. जगण्यासाठी लागणारा पैसा हा आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली किमान गरज आहे. त्यात अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्यसेवा यासारख्या खर्चाचा समावेश होतो. जगण्यासाठी, पैशाशिवाय, आपले आरोग्य आणि कल्याण धोक्यात येऊ शकते.



आधुनिक केसरी

## भेटे माता पिता | पंढरीत ||

भावाच्या नदीला | भक्तीचा हा पूर ||
चंद्रभागा तीर | ओसंडतो ||१||
सुख दुःख टाळ | समेत वाजतो ||
मृदुंग बोलतो | अनाहत ||२||
भाबड्या मनाला | भाबडे डोहाळे ||
आनंदी सोहळे | भजनात ||३||
भाग्याने भोगतो | भाग्य संचिताचे ||
लावण्य सुखाचे | दिंडी दावी ||४||
अहंकारा संगे | विकार लोपता ||
भेटे माता पिता | पंढरीत ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अनुभवगामी चढ़त हैं,
सुक्ष्म पन्थ पर यह ।
झुलत हिंडोला प्रेम का, पहुँचे अपने गेह
।।३६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/३६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विहंगम योगाचा अनुभवी साधक या सूक्ष्म पथावर चढतो आणि प्रेमतारेच्या झोपाळ्यावर झूलत चेतन धामाला पोहोचतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## "गुणरूपनिरूपण"

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

त्याचप्रमाणे वस्तूला व्यापणारे आकाश सोडायचे हे दोन्ही सोडून उरणारे शुध्द केवळ अनंत अस्तित्व तेचं परमात्मस्वरूप समजावे.
आकाशाला दृश्याने मर्यादा घातली एका अर्थाने ते दृष्याच्या विळख्यात सापडले. सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर ते ज्ञेयरूपाने अनुभवास येते. ज्ञेयरूप म्हणजे (वेगळे रूप) अशाप्रकारे आकाश पाच भूतांपैकी एक आहे. श्रीराम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ


## निरूपण

आधुनिक केसरी

नाना वल्लीचे रस । काडे गर्गोड कर्कश ।
घेतां होये कासावीस । या नांव आदिभूतिक ॥ ३२॥
ढाळ आणी उखाळ देती । पथ्य कठीण सांगती ।
अनुपान चुकतां विपत्ती । या नांव आदिभूतिक ॥ ३३॥
फाड रक्त फांसणी । गुल्लडागांची जाचणी ।
तेणें दुःखें दुःखवे प्राणी । या नांव आदिभूतिक ॥ ३४॥
रुचिक बिबवे घालिती । नाना दुःखें दडपे देती ।
सिरा तोडिती जळा लाविती । या नांव आदिभूतिक ॥ ३५॥
बहु रोग बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें ।
प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव आदिभूतिक ॥ ३६॥
बोलाविला पंचाक्षरी । धूरमार पीडा करी ।
नाना यातना चतुरीं । आदिभूतिक जाणिजे ॥ ३७॥

## विषयाची व लौकिकाची आस सोडावी

आधुनिक केसरी



आपण रामाचे झालो म्हणजे आपली काळजी त्याला लागते. आपण रामाचे व्हायला अडचण आमचीच. आवडच मुळी आपण विषयाची आणि लौकिकाची ठेवतो. साहजिकच, एकाची आसक्ती ठेवल्याने दुसऱ्याची विरक्ती येते. नोकरीच्या वेळेस आम्ही बायकोमुलांना बाजूला सारून कामावर जातो ना? मग साधनेच्या वेळी बायकोमुले आड येतात हे कारण का सांगावे ? बायको आणि पैका या दोन गोष्टी आमच्या आड येत असतात; असे आजवर अनेक संतांनी सांगितले. मग या निर्माण तरी का केल्या असे कोणी विचारतील. त्याला उत्तर म्हणजे, काड्याच्या पेटीने विस्तवही पेटविता येतो आणि घरही जाळता येते; त्याचा जसा आपण उपयोग करावा तसा तो होतो. खरे म्हणजे आम्हाला भगवंताची तळमळच लागत नाही. एकजण मला म्हणाला की, मला प्रपंच टाकावासा वाटतो." मी त्याला म्हटले, " नुसता प्रपंच टाकण्याने तुला वैराग्य कसे येईल ? वैराग्याला नेहमी विवेकाची जोड लागते. तू आपला मीपणा टाकलास तरी खूप झाले. चांगले कर्म आड येत नाही असे थोडेच आहे ? वाईट कर्म कुणाला सांगण्याची तरी आपल्याला लाज वाटते, पण सत्कर्म आपण अभिमानाने ज्याला त्याला सांगत सुटतो. ' मागील जन्मी पाप केले होते म्हणून या जन्मी हे भोगतो ' असे म्हणतो; आणि ' आता चांगली कर्मे करतो म्हणजे पुढल्या जन्मी सुख लागेल ' असे म्हणतो. म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटण्याऐवजी त्याच्यात गुंडाळले जाण्यासारखेच झाले ! दुष्कर्मामुळे पश्चात्ताप होऊन एकदा तरी भगवंताची आठवण होईल; परंतु सत्कर्माचा अहंकार चांगल्या माणसालाही कुठे नेऊन सोडील याचा पत्ता लागणार नाही. राजासुद्धा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आपल्या संगतीला चांगला माणूस ठेवतो. भगवंताने उद्धवालाही ' सत्समागम कर ' म्हणून सांगावे, याहून अधिक काय पाहिजे ? कडू कारले खाल्ले तर कडूपणाचीच प्रचीती येते, मग विषयाच्या प्राप्तीने जीवन गोड कसे होईल ? ' प्रेम येईल तेव्हा भगवंताची भक्ती करीन ' असे म्हणू नये. विषयासाठी आपण मरमर काम करतो आणि तेवढे करूनही सुख लाभत नाही; मग भगवंताचे नाव न घेता, प्रेम येत नाही हे म्हणणे किती वेडेपणाचे आहे ! लग्नाआधी मुलीला दहापाचजणांना दाखविली तरी, लग्न झाल्यावर ज्याप्रमाणे त्यातला एकच नवरा असतो आणि बाकीच्यांची तिला आठवणही राहत नाही, त्याप्रमाणे, आम्ही एकदा रामाचे झालो, म्हणजे त्याच्याशी लग्न लावले, म्हणजे मग विषयांचे प्रेम कुठे आले? **१३५. भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी.**

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २४ एप्रिल २०२४

adhunikkesari.com


## पंकजाताई मुंडे जन आशीर्वाद रॅलीने आज दाखल करणार उमेदवारी अर्ज : राजेंद्र मस्के

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** लोकसभा मतदार संघ भाजपा महायुतीचे उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे आणि घटक पक्षांच्या नेते मंडळीच्या समवेत आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, बीड शहरात त्यांच्या समर्थनार्थ जन आशीर्वाद रॅली काढण्यात येत आहे. या रॅलीमध्ये समाजातील विविध घटकातील लोक उत्स्फूर्तपणे सहभागी होणार असून जाहीर सभेने या रॅलीचा समारोप होईल. अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

खा. डॉ. प्रितमताई मुंडे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. बाळासाहेब आजबे, आ. लक्ष्मण पवार, आ. नमिताताई मुंदडा, आ. संजय दौंड, अमरसिंह पंडित माजी आमदार, भीमराव धोंडे माजी आमदार, राजेंद्र मस्के जिल्हाध्यक्ष, राजेश्वर चव्हाण जिल्हाध्यक्ष (राष्ट्रवादी), अनिल जगताप जिल्हाप्रमुख (शिवसेना), सचिन मुळूक जिल्हाप्रमुख (शिवसेना), कुंडलिक खांडे जिल्हाप्रमुख (शिवसेना), पप्पुजी कागदे प्रदेशाध्यक्ष (युवा रिपाई), आण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष (रासप), प्रकाश महाजन मनसे नेते, राजेंद्र मोटे जिल्हाध्यक्ष (मनसे), सुमंत धस



जिल्हाध्यक्ष (मनसे), श्रीराम बादाडे जिल्हाध्यक्ष (मनसे), तुरुकमारे सर रिपाइं (कवाडे गट), रमेश आडसकर भाजपा नेते, मोहन जगताप, कल्याण आखाडे राष्ट्रवादी ओबीसी सेल, योगेश क्षीरसागर राष्ट्रवादी, ॲड. वाल्मिक निकाळजे, सलीम जाहगीर, फारूक पटेल नगरपरिषद माजी उपाध्यक्ष, पि.टी चव्हाण भटके वि.आघाडी आदीसह विविध क्षेत्रातील मान्यवरासह पदाधिकारी व कार्यकर्ते रॅली व जाहीर सभेत सहभागी होणार आहेत. लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी अगदी साधेपणाने उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु विविध घटकातील नागरिकांनी उमेदवारी अर्ज भरताना उपस्थित राहून, समर्थन देण्याची इच्छा प्रकट केली. लोकभावनेचा आदर बाळगून आज सकाळी साधेपणाने पंकजाताईंचा उमेदवारी अर्ज भरणार असून, विविध घटकातील लोकांच्या इच्छेनुसार दुपारी 03.00 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून पारस नगरी, माने कॉम्प्लेक्स पर्यंत रॅलीचे आयोजन केले आहे. पारस नगरी, माने कॉम्प्लेक्स येथे जाहीर सभेने या रॅलीचा समारोप होईल. जन मनांचा प्रत्यक्ष अशीर्वाद घेण्यासाठी ही जन आशिर्वाद रॅली काढण्यात येत आहे. भाजपा महायुती पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंखेने सहभागी व्हावे..!



## संविधान टिकवण्यासाठी महाविकास आघाडीला विजयी करा : आ. धीरज देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आपल्याला आरक्षण मिळाले पाहिजे शेतीमालाला भाव मिळाला पाहिजे व संविधान टिकले पाहिजे यासाठी महाविकास आघाडीला विजयी करावे असे प्रतिपादन काँग्रेसचे युवानेते आ. धीरज विलासराव देशमुख यांनी सोनखेड येथे नांदेड लोकसभेचे काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत केले.

लोहा तालुक्यातील व नांदेड लोकसभा मतदारसंघातील सोनखेड येथे नांदेड लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), शिवसेना (उबाठा) व सेवा जनशक्ती पार्टी या महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ दि. २२ एप्रिल रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे, शिवसेना उबाठा चे माजी खासदार सुभाष वानखेडे, प्रा. रविन्द्र वसंतराव चव्हाण,काँग्रेसचे नांदेड दक्षीणचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे,काँग्रेसचे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, शिवसेना उबाठा चे माजी आमदार रोहिदास चव्हाण, शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार, काँग्रेसचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्रीनिवास मोरे, भुजंगराव डक, राहुल हंबर्डे , शिवसेनेच्या महिला जिल्हा संघटक वत्सलाताई पुयड, भगवानराव आलेगावकर, माजी उपमहापौर शमीम अब्दुला, सुभाष रायबोले, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेशराव मोरे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आ. धीरज विलासराव देशमुख म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य रयतेसाठी स्थापन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान जनतेचे गोरगरिबांचे राज्य आले पाहिजे यासाठी स्थापन केले. महाराष्ट्रात आपण अलिकडच्या काळात बघतोत ज्यांना जनतेनी निवडुण दिले ते आमदार, खासदार मंत्री झाले ते जनतेला विसरलेत. भाजपाचे काय चाललंय " राम नाम जपना पराया आमदार, खासदार आपना" आपना सपना अस चाललय. कोविड काळात माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी चांगले केले आहे.जो विकास झाला आहे तो महाविकास आघाडीच्या काळात झाला आहे. आम्ही सत्तेचे गुलाम नाहीत पण सत्याच्या बाजूने आहेत. काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले १३५ वर्षांचा इतिहास काँग्रेसला आहे. कै. शंकरराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा वसंतराव चव्हाण हे चालवित आहेत.

तेव्हा विकासासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट ) शिवसेना (उबाठा) व सेवा जनशक्ती पार्टी या महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांना निवडून द्यावे असे आवाहन आ.धीरज विलासराव देशमुख यांनी केले आहे. माजी शिक्षण सभापती संजय पाटील कराळे व यादवराव मोरे यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश नांदेड लोकसभेची निवडणूक अवघ्या तीन -चार दिवसांवर आली असताना भाजपाला मोठे खिंडार पडले असुन माजी शिक्षण सभापती संजय पाटील कराळे व यादवराव मोरे यांनी काँग्रेस युवानेते आ.धीरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सोनखेड येथे काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. त्यांचे पुष्पहार घालून स्वागत आ.धीरज देशमुख,आ.मोहन अण्णा हंबर्डे व महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी केला आहे. कार्यक्रमांचे प्रस्ताविक काँग्रेसचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्रीनिवास मोरे यांनी केले तर आभार शिवसेना उबाठाचे उपजिल्हाप्रमुख गणेशराव मोरे यांनी मानले. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार,, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दता पाटील दिघे, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष रंगनाथ भुजबळ, सोनखेडचे माजी सरपंच अच्युत मोरे, पारडी चे माजी सरपंच दिगांबर पाटील डिकळे, बालाजी पाटील डिकळे, सतीश पाटील कराळे, युवक काँग्रेसचे महासचिव मधुकर पाटील दिघे, माजी नगरसेवक वसंतराव पवार, प्रकाश मोरे, विलास मोरे, कैलास मोरे, राम पाटील सावंत, शिवसेना उबाठाचे लोहा तालुकाप्रमुख चंद्रकांत पाटील क्षीरसागर, निळाचे सरपंच गजानन पाटील मोरे, शिवसेना उबाठा नांदेड दक्षीणचे बाबुराव मोरे, शेषराव दिघे,पद्माकर सावंत, तुकाराम लुटे, शेवडीचे सरपंच बसवेश्वर धोंडे, अरुण नाईकवाडे, यांच्यासहित मोठ्या संख्येने नागरिक, महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**देशाची लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी महाविकास आघाडीला पाठिंबा :** देशाची लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी महाविकास आघाडीला सेवा जनशक्ती पार्टीने पाठिंबा दिला असल्याचे प्रतिपादन सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख प्रा मनोहर धोंडे यांनी केले . पुढे बोलताना प्रा . मनोहर धोंडे म्हणाले की, नांदेडचे महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण हे २ लाखांच्या मताधिक्याने निवडून येणार आहेत . भाजपाचे उलटे चाललंय काँग्रेस मुक्त भारत ऐवजी काँगेस युक्त भाजपा झाली आहे . सर्व भ्रष्ट लोक हे भाजपात सामिल झाले आहेत . देवेंद्र फडणवीस हे देवेंद्र फसवणिस आहेत त्यांनी आरक्षणासाठी सर्वांना फसवले आहे . नांदेडच्या खासदारांची गेल्या पाच वर्षांत काहीही विकास केला नाही .संसदेत तोंड उघडले नाही फक्त दारुची दुकाने आणली . तेव्हा नांदेडच्या जनतेनी नांदेडच्या विकासाची महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांना निवडून द्यावे असे आवाहन प्रा .मनोहर धोंडे यांनी केले आहे .



## पत्रकार संघाची मागणी इतर राज्यातील पत्रकारही लावून धरतील

### अमर उजालाचे निवासी संपादक विजयकुमार गुप्ता यांचे मत

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना आयकरात वार्षिक पाच हजारांची सुट द्यावी, ही मागणी वृत्तपत्रांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करणारी आहे. पहिल्यांदाच अशा प्रकारे मागणी झाली असून ती पूर्णत्वाकडे नेण्यासाठी लोकसभा निवडणूकीतील उमेदवारांना निवेदन दिल्याने याकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे दिल्लीसह इतर राज्यातील वृत्तपत्र आणि पत्रकार संघटनाही ही मागणी लावून धरतील त्यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही राष्ट्रीय दैनिक अमर उजालाचे निवासी संपादक विजयकुमार गुप्ता यांनी दिली. बीड लोकसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थितीचे वार्तांकन करण्यासाठी राष्ट्रीय दैनिक अमर उजालाचे निवासी संपादक विजयकुमार गुप्ता आले होते. त्यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांची भेट घेवून पत्रकार संघाने उमेदवारांकडे केलेल्या मागणींबाबत चर्चा केली. कोरोनानंतर अडचणीत आलेल्या वृत्तपत्रांना केंद्र सरकारने मदत करावी यासाठी पत्रकार संघाने अर्थमंत्र्यांकडे वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना वार्षिक पाच हजारांची सुट द्यावी अशी मागणी केली आहे. त्यासाठी लोकसभा निवडणूकीतील सर्व पक्षीय शंभर उमेदवारांना या मागणीला पाठींबा मिळावा आणि संसदेत पाठपुरावा व्हावा यासाठी निवेदन देण्याची मोहिम चालवली आहे. देशात पहिल्यांदाच अशा पध्दतीने वृत्तपत्रांसाठी मागणी झाली असून मागणी पुर्णत्वाकडे जावी यासाठी निवडणूकीच्या मैदानातील उमेदवारांना निवेदन देवून पाठींबा मिळवण्याचा प्रकारही पहिल्यांदाच आपण ऐकतो आहे. पत्रकार संघाचे हे काम वृत्तपत्रांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. त्यामुळे दिल्ली आणि उत्तर भारतातील वृत्तपत्र आणि पत्रकार संघटनाही या मागणीला पाठींबा देतील यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी दिली. लवकरच दिल्ली येथे या मागणीबाबत संघटनांशी चर्चा करण्यात येणार असल्याचे यावेळी वसंत मुंडे यांनी स्पष्ट केले.

## सोलापुरात २१ तर माढ्यात ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** सोलापूर लोकसभा मतदारसंघात ३२ पैकी ९ उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे २१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. तर माढा मतदारसंघात ६ उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे ३२ उमेदवारांमध्ये अंतिम लढत होणार आहे. उमेदवारी माघार घेतलेल्यांमध्ये सोलापुरातील वंचित बहुजन आघाडीचे राहुल गायकवाड तर माढ्यात शेकापचे बंडखोर ॲड. सचिन देशमुख यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

## रेणुका माता यात्रा महोत्सवाला मोठ्या थाटात सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील श्री रेणुका माता पंचमी महोत्सवची दि.२२ बोहडा तथा नृसिंहाच्या सोंग मिरवणूक दर्शनानंतर सांगता झाली असुण दि.२३हनुमान जन्मोत्सव नंतर यात्रा महोत्सव ला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे तर भाविक भक्तांनी मंदिर व परिसरात प्रचंड गर्दी केली आहे. रेणुका माता देवीची आरती पुजा अभिषेक व विधिवत धार्मिक कार्यक्रम वस्त्रालंकार गुरुने केले नऊ दिवसांचे उपवास, नवस फेडणे, व्रतांचे नैवेद्य दाखवणे,तकतराव, काठी मिरवणूक त्यात गीतगायन नृत्य कार्यक्रमाची रेलचेल आदि धार्मिक व परंपरागत कार्यक्रम मोठ्या उत्साहात भाविक भक्त सामुहिकरीत्या केले. दरम्यान येथील श्री रेणुका ( जगदंबा) माता मंदिर पुरातन मंदिर असुण सभामंडप भव्य उंच कमानी आहे त्याची रंगरंगोटी सुशोभीकरण चमकी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.व ती नेत्रदिपक ठरत आहे.पंचमी महोत्सवची सांगता होताच यात्रा महोत्सव ला प्रारंभ झाला आहे.व मोठी गर्दी मंदिर परिसर तथा यात्रेत दिसून येत आहे.रेणुका (जगदंबा) माता ही एक जागृत देवस्थान ग्राम दैवत असुण पंचक्रोशी बरोबरच महाराष्ट्रातून भाविक भक्त येथे यात्रा महोत्सव व दर्शनासाठी पोहचतात.यात्रेत विविध प्रतिष्ठाने लागली आहे. यात्रा महोत्सव साठी श्री रेणुका माता मंदिर विश्वस्त (ट्रस्ट) बरोबरच ग्रामपंचायत कार्यकारिणी तथा सेवीभावी संस्था स्वंय सेवक भाविक भक्त सर्वच येथे सहकार्य सेवा देताना दिसून येत आहे.

# कार्यकर्ते काँग्रेसबरोबरच

आधुनिक केसरी

काँग्रेसचे नेते पक्षाला सोडून जात असले तरी तळागाळातील कार्यकर्ते पक्षाबरोबरच आहेत. जोपर्यंत बुथस्तरीय किंवा ब्लॉकस्तरीय कार्यकर्ते आमच्याबरोबर आहेत तोपर्यंत आम्हाला चिंता करण्याचे कारण नाही, असा विश्वास काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विविध प्रश्नांची उत्तरे देताना व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रालोआला ४०० जागा मिळतील तर राहुल गांधी भाजपला १५०पेक्षा जास्त जागा मिळणार नाहीत असे म्हणतात, त्याबद्दल विचारले असता खरगे यांनी देशात सत्ताबदल होईल असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, “मोदी बोलतात त्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवणे कठीण आहे. त्यांचे हे स्वप्न पूर्ण होणार नाही. त्यांना रोखण्यासाठी आम्ही आवश्यक संख्याबळ जमा करत आहोत. आम्ही भाजपला दाखवून देऊ की, विरोधकांना नाही तर जनतेला बदल हवा आहे. ‘इंडिया’ आघाडी मजबूत संख्याबळासह पुन्हा येईल आणि त्यांचा पराभव करेल. मोदींना पराभवाची भीती भेडसावत असल्याचा दावा खरगे यांनी केला. हिंदी पट्टयामधील काँग्रेसच्या स्थितीबद्दल विचारले असता, खरगे यांनी उत्तर प्रदेश, बिहारचा काही भाग आणि उत्तराखंड यासारख्या काही ठिकाणी पक्षाची स्थिती चांगली नसल्याचे मान्य केले. मात्र, अन्य राज्यांमध्ये पक्ष मजबूत असून उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष (सप) आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल (राजद) यांच्याबरोबर केलेल्या आघाडीचा फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला. पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि आसाम तसेच ओडिशामध्ये काँग्रेसची कामगिरी चांगली होईल असे ते म्हणाले. काँग्रेस पक्ष राज्यघटना आणि लोकशाहीबद्दल बोलतो पण लोकांचे मुद्दे उपस्थित करत नाही अशी टीका होते, या प्रश्नाचे उत्तर देताना खरगे यांनी महागाईविरोधात पक्षाने सर्व राज्यांमध्ये निदर्शने केल्याचे सांगितले. या निवडणुकीत काँग्रेस ३००पेक्षा कमी जागांवर निवडणूक लढवत आहे. यामुळे राष्ट्रव्यापी पक्ष म्हणून दावा सोडून दिला आहे का असे विचारल्यावर खरगे यांनी सांगितले की, “काँग्रेस पक्ष ३५०पेक्षा जास्त जागांवर निवडणूक लढवत आहे. तसेच २८० जागांवर उमेदवार घोषित केले आहेत. महाराष्ट्रात केले त्याप्रमाणे मित्र पक्षांना सामावून घेण्यासाठी काही जागांचा त्याग करावा लागतो. ‘इंडिया’ आघाडी एकसंध ठेवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले.

# उद्धव ठाकरेंचा मानसिक प्रवास नैराश्याकडे



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**उद्धव ठाकरेंचा राजकिय प्रवास वासे फिरल्यासारखा सुरू असल्याने मानसिक प्रवास देखील नैराश्याच्या गर्तेत जाताना दिसु लागला. मी काय बोलतो?किंवा कसं बोलुन गेलो? याचं भान जेव्हा रहात नाही तिथं स्मृतीभ्रंश म्हणावा लागेल. आजवर म्हणाले मुख्यमंत्री पदाचा शब्द अमित शहांनी दिला आणि आता जेव्हा एकही खासदार निवडुन येण्याची शक्यता वाटेना तेव्हा लेकराची लोकप्रियता वाढवण्यासाठी डबल ढोलकी बदडल्यासारखं राजकारण करू लागले. म्हणाले देवेंद्र फडणवीसांनी आदित्य ठाकरेला मुख्यमंत्री करण्याचा शब्द दिला होता. आईच्या पोटात लेकरू असताना पाहिलेले स्वप्न सांगण्यासाठी असतं.**

तसंच काही ठाकरेंचं स्वरूप असल्याचे लक्षात येवु लागलं. संजयामार्फत स्वतःला पंतप्रधान पदाच्या खुर्चीवरही केलेले भाकित नियोजनाचा भागच असावा. हे सारं पाहिल्यानंतर खरंच शिव उबाठाचे वासेच फिरले असुन जणु काही पराभव लोकसभेतला त्यांनी वर्तमान स्थितीतच स्विकारला की काय? अशा प्रकारची भाषा त्यांच्या तोंडून ऐकायला मिळते. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या बाबतीत व्यक्तीद्वेषाचा काविळ झाल्याचंही दिसु लागलं.

2019 ला मुळातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तुफान लाटेमुळे तत्कालीन शिवसेनेला 18 जागा मिळाल्या होत्या. तसं पाहता दुसऱ्याच्या चुलीवर भाजलेल्या भाकरी असाच अर्थ 18 जागेचा निघु शकतो. पण ही ताकद आपलीच असल्याची हवा त्यांच्या डोक्यात आजही पहायला मिळते. खरं तर आज झालेला काडीमोड शिवसेनेसोबत तेव्हाच झाला असता तर दुध का दुध, पानी का पानी होवुन गेलं असतं पण पदरात पडल्यानंतर धोकाधडीचं राजकारण केवळ मुख्यमंत्री पदासाठी भाजपासोबत करण्यात आलं. विधानसभा निवडणुकीत स्पष्ट जनादेश महायुतीला दिला होता. मात्र मुख्यमंत्री पदाचा शब्द आम्हालाच दिला? रडीचा डाव मांडत चक्क बारामतीची दावण संजयामार्फत गाठली आणि पंचेवीस वर्षाची युती तोडली. ती केवळ खुर्चीसाठी?तेव्हापासून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील हिंदुत्व विचारसरणीच्या सुज्ञ लोकांचा विश्वास उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावरचा उडालाच असं म्हणायला हरकत नाही. मग त्यांनी महाविकास आघाडी स्थापन केली. मातोश्रीतला वाघ सोनियाच्या दरबारात सत्तेचा पाठिंबा घेण्यासाठी दोन-दोन दिवस ताटकळत बसला. दोन- अडीच वर्षे मुख्यमंत्री पदावर बसुन कारभारही केला. राज्यात भ्रष्ट कारभार अकार्यक्षमतेने कसा चालवला जातो? हे मुख्यमंत्री होते पण कारभार सिल्वर बंगल्याहून चालायचा. ज्यांच्या राज्यात गृहमंत्री 100 कोटीच्या वसुली आरोपात जेलमध्ये जातो. करोनाच्या नावाखाली भ्रष्टाचाराचा मांडलेला थयथयाट आणि मुख्यमंत्री पदावर बसुन अडीच वर्षात केवळ दोन वेळा मंत्रालयाचं तोंड पाहिलं.

वास्तविक पहाता स्व.बाळासाहेब ठाकरे कधीच सत्तेच्या राजकारणात शिरले नाहीत. त्यांनी सत्ता चालवली मातोश्रीवर बसुन पण सहभागी झाले नाहीत. उद्धवजींना एवढी लालसा पदाची होती की त्यांनी लेकराला देखील मंत्री पद दिलं. खरं तर एखाद्या सामान्य शिवसैनिकाला दिलं असतं तर



लोकांनी त्याचं स्वागत केलं असतं आणि हे सारं करत असताना त्यांच्या राजकिय सोंगड्या टाकणारे संजय राऊत यांनी तर मातोश्रीला दिल्लीत सोनियाच्या दरबारी आणि सिल्वर बंगल्यावरचं पायपुसणं करून ठेवलं. महाविकास आघाडीसोबत गेल्यानंतर उद्धवजींनी हिंदुत्वाचा अजिंडा मातोश्रीच्या बंगल्यातुन बाहेर काढला आणि शेजारच्या समुद्रात नेवुन टाकला. स्वतःचा चेहरा जनाब पदवीने घडवीत असताना राज्यकारभार मताचं लांगुलचालुन करण्यासाठी केला हे मात्र नक्की. मी हिंदुत्ववादी नाही तर मी धर्मनिरपेक्षवादी आहे हे उद्धवजींना महाविकास आघाडीच्या नेत्यांना दाखववं लागलं. कारण ते आयोध्येत 22 जानेवारी प्राणप्रतिष्ठा झालेल्या रामलल्ला सोहळ्याला देखील आले नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने रामाचे नाव घेण्याचा अधिकार आता नैतिकदृष्ट्या उद्धवजींना राहिलाच नाही. कालपरवा त्यांनी एक नविन राजकिय बॉम्बस्फोट केला. भाजपासोबत युती तोडताना गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबईत येवुन आम्हाला मातोश्रीच्या बैठकीत मुख्यमंत्री पदाचा शब्द दिला होता. हे वाक्य महाविकास आघाडीत गेल्यानंतर देखील त्यांनी चार वर्षात 156 वेळा वापरले. त्याची सत्यता खऱ्या अर्थाने

भाजप नेत्यांनी अनेकदा जाहिरपणे बोलुन दाखवली. पण राजकारणातली लबाडी नेते जेव्हा करतात त्यांच्या अंगी असंख्य ढोंग असतात. ज्यातुन तो बाहेर पडु शकत नाही. उद्धवजींनं केलेला उद्योग नियतीलाच मान्य नव्हता. म्हणुनच की काय एकनाथ शिंदेंच्या रूपाने मोठं बंड उफाळुन आलं. एक नव्हे तर तब्बल 40 आमदार बाहेर पडले. ज्यांना स्थिर सरकार देण्यासाठी भाजपाने साथ दिली. खरं तर मुळ शिवसेना ठाकरेंना सांभाळता आली नाही. रोज भाजपवर वेगवेगळे आरोप लावतात. पण ज्यात काडीचाही संबंध भाजपाचा नव्हता. काल तर राजकिय कहर केला. काय तर म्हणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आदित्य ठाकरेला मुख्यमंत्री करू असा शब्द दिला होता. हा स्फोट तसं पाहता पाळण्यातल्या लेकरांनी फुगा फोडण्यासारखाच म्हणावा लागेल ज्याला कुठलाही वैचारिक आणि तात्विक आधार नाही. पण उद्याच्या होवु घातलेल्या लोकसभा निवडणुकीत पराभवाचे संकेत 100 टक्के मिळत असल्याने त्यांची मानसिकताच बिथरल्यासारखी झाली. देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत अपशब्द वापरणं नव्हे तर व्यक्तिद्वेषातुन टिका करणं याचाच अर्थ राजकिय सोडीअम कमी झालं तेव्हा उपचार घेण्याची गरज नक्कीच आहे. महाराष्ट्रातील जनतेला फडणवीसांचा स्वभाव चांगला माहित असून हे नेतृत्व कार्यक्रम करायचा तर करेक्ट करते अन्यथा भानगडीत पडत नाही. डबल ढोलकीचं राजकारण उद्धव ठाकरे कशामुळे करू लागले? लेकराला मुख्यमंत्री ही उपाधी देवुन त्याची कुठली लोकप्रियता त्यांना

वाढवावी वाटली. मुंबईसारख्या शहरात देखील एकही जागा त्यांच्या हाती लागणार नाही. मग अनिल देसाईच्या मतदारसंघात जावुन अशा प्रकारे कोरडा घसा का करावा? असे प्रश्न जेव्हा लोकांनाही पडले तेव्हा मात्र ठाकरे हे हतबल झाले असुन त्यांची मानसिकता पराभवाच्या दिशेने जणु काही ते तयारच करू लागले असं स्पष्ट त्यांच्या डबल ढोलकीच्या राजकारणातुन पहायला मिळतं. खरं तर फडणवीसांनी विधानसभा निवडणुक लढवायला नको असं 2019 लाच आदित्याच्या बापाला अर्थात उद्धजींना अधिकार वाणीतुन सांगितलं होतं. कारण संघटनात्मक कामाचा अनुभव महत्वाचा असतो. मात्र कुठचं काही चालेना की व्यक्तिद्वेष करणे हाच काही राजकिय नेत्यांचा खेळ असतो. ज्याप्रमाणे शरद पवारांचं राजकारण पहायला मिळतं. लोकसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे घरीच बसणार असा घणाघाती आरोप भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तरात बोलताना केलाच. पण हे खरंच आहे की, जणु काही शिव उबाठा गट शेवटच्या घटका मोजत आहे. ज्यातुन नेतृत्वाची मानसिकता बिथरल्यासारखी झाली असुन काय कुणावर कशाचा आरोप याचं देखील भान त्यांना राहिलेले दिसत नाही. मुख्यमंत्र्याचा शब्द नेमका कुणी दिला होता? हे सत्य तरी आता उद्धवजींनं जनतेला सांगायला हवं. अन्यथा आदित्य ठाकरेंचाही विश्वास आता पिता म्हणुन तुमच्यावर राहणार नाही. कारण तुम्ही सपशेल राजकिय दरबारात खोटं बोलु लागलात.

# घोटभर पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सध्या पाणीटंचाईच्या झळा गाव खेड्यात वाडी वस्ती तांड्यावर खुप मोठ्या प्रमाणात जाणवतं आहे घोट पाण्यासाठी जीव संकटात घालावा लागत आहे. म्हणजेच घोटभर पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो आहे. सुर्य आग ओकू लागला आहे उन्हाळ्यातील पाणी टंचाई उग्र रूप धारण करते आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे.घोटभर हंडाभर पाण्यासाठी महिला दोराच्या सहायाने जीव धोक्यात घालून विहिरीत उतरत आहेत. हे वास्तव असून हे चित्र पाहून मनात अनेक गंभीर प्रश्न निर्माण तर होत आहेतच पण त्याच बरोबर मन खिन्न देखिल होत आहेत. आपण नेमके प्रगत आहेत का?आणि आहेत तर मग आजही राज्यातील वेगवेगळ्या भागात असणारी भिषण अशी पाणी टंचाई किती गंभीर रूप धारण करत आहे.**

अनेक महिला लहान मुली मुलं यांना हंडाभर पाणी मिळविण्यासाठी दोराच्या सहायाने जीव धोक्यात घालून अगदी जीवावर उदार होऊन पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो आहे. हे भयानक असं वास्तव आहे.एका बाजुला प्रगती आहे तर दुसरया बाजुला हि कठिण स्थिती पण या मधून मार्ग निघणार तर कधी आणि घरा घरात दरादरात पाहिजे तितकं पाणी उपलब्ध होऊन हे पाण्याचं गणित सुटणार कधी आणि कसं याची वाट गावं खेड्यातील सर्व सामान्य माणस पाहत आहेत.वाडी वस्ती तांडा आदीवासी पाडा या सगळ्या ठिकाणी उन्हाळ्यात आवश्यक तितक पाणी उपलब्ध होण्यासाठी नियोजन होण्यासाठी जल निती आखली गेली पाहिजे. पाणी म्हणजे जीवन पाणी वगळुन जीवनाची कल्पना शक्यच होऊ शकत नाही.तरी पण आपण पाण्याच्या गणिता संदर्भात गंभीर नाहीत. वर्षभर आवश्यक पाणी उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त पाणी साठे निर्माण करणं,पावसाचं पाणी जास्त प्रमाणात जमीनीत मुरवण,जल पुनर्भरण पाण्याचा होणार बाष्पीभवन कसं रोखता येईल यासाठी प्रयत्न करणं, नदीचं पुनर्जीवन,त्याच बरोबर पाण्याची वाढती गरज आणि उपलब्धता याच गणित जुळविल गेलं पाहिजे हिच जल निती असली पाहिजे अन्यथा गणित जुळलेलं गेलं नाही तर भविष्यात पाण्यासाठी वाद होतील.पावसाचं पाणी योग्य पद्धतीने अडविणे गरजेचे आहे.त्याच बरोबर जलस्रोत बळकटीकरण त्याच बरोबर पावसाचं पाणी जमिनीत जास्तीत जास्त मुरविण्यात आपण कमी पडत असुन पाण्याचं योग्य नियोजन करण्यात अजुनही पाहिजे तसं यश आपल्याला लाभलेल नाही.परिणाम स्वरूप राज्यातील अनेक गावांत वाडी वस्ती तांड्यावर भिषण पाणीटंचाई जाणवते आहे. पाण्यासाठी भटकंती करावी लागण हे खरंच वेदनादायी आहे. पाण्याचं जीवनातील महत्व अनन्यसाधारण असंच आहे. प्रत्येक सजीवाला दैनंदिन जीवनात विविध गरजांसाठी पाणी हे आवश्यकच असते. तसंच विविध विकास योजना व औद्योगिक विकास शेती साठी पाणी आवश्यक असतं.पण पावसाळ्यात मुबलक प्रमाणात असणार पाणी उन्हाळ्यात मात्र डोळ्यात अस्व आणत.हे भीषण असं वास्तव आहे.सुर्य आग ओकतोय पारा चळिस पार गेलाय त्याच बरोबर प्रचंड उकाडा त्यामध्ये भर म्हणून पाणी टंचाई म्हणजे दुष्काळात तेरावा महिना असंच काहीसं चित्र साध्य निर्माण झालं आहे.थेंब थेंब पाण्यासाठी वणवण भटकंती सोबतच जीवघेणा संघर्ष करत जीव धोक्यात घालून कठिण अशा विहिरीत उतरत महिला,मुलं,मुली हंडा हंडा पाणी गोळा करत आहेत.पण हा संघर्ष कधी संपणार गरिबांच्या नशीबातील हा जीवावर बेतणारा संघर्ष कधी तरी संपला पाहिजे.पावसाळ्यात नदी नाले विहिरी तुडुंब भरून वाहतात मात्र उन्हाळ्यात एक एक थेंब पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो हि परस्पर विरोधी परिस्थिती निर्माण झाली आहे याचा बोध घेऊन आपण कधी मार्ग काढणार आहेत. पावसाळ्यात पाण्याचा सुकाळ आणि उन्हाळ्यात दुष्काळ हे चित्र कधी पालटणार जसा जसा उन्हाळा अंतिम टप्याकडे वाटचाल करतो आहे.तसं तसं राज्यात वेगवेगळ्या भागात भिषण पाण्याची टंचाई निर्माण होतेआहे.अगदी शेवटच्या टप्प्यात विहिरीत उतरून थेंब थेंब पाणी भराव लागत आहे.अगदी बायका छोटी मुलं घोटभर पाण्यासाठी जीव धोक्यात घालून विहिरीत उतरताना आपण पाहतो आहोत. हा जीवघेणा संघर्ष आहे.पण हा संघर्ष कधी तरी थांबला गेला पाहिजे.पावसाळ्यात पाणीच पाणी सगळीकडे तुडुंब पाणी असतं पण उन्हाळ्यात मात्र घोटभर पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो हि अंत्यंत खेदजनक बाब असुन वेळ काळ परिस्थिती कधी बदलणार.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आ. किशोर जोरगेवार यांचा एक फोन आणि महाकाली भक्तांसाठी उघडली मदरशाची दारे

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** हिंदू मुस्लिम ऐकतेची अनेक उदाहरणे आजवर चंद्रपूर जिल्हाने दिली आहे. असेच एक आदर्श उदाहण पून्हा एकदा दिसुन आले असून आमदार किशोर जोरगेवार यांनी फोन करताच जामा मस्जिद पब्लिक ट्रस्ट चा दादमहल येथील शेरेतुल इस्लाम मदरसा येथे महाकाली यात्रेकरूंना आश्रय दिला आहे.

चंद्रपुरातील महाकाली यात्रा शेवटच्या टप्प्यात पोहचली आहे. त्यामुळे राज्य व राज्याबाहेरील लाखो भाविक माता महाकालीच्या दर्शनासाठी चंद्रपूरात दाखल झाले आहे. या भाविकांच्या राहण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार आणि त्यांचे मित्र डेकोरेशन व्यावसायिक अब्दुल कादर यांच्या वतीने कोहिनूर तलाव येथे पेंडाल टाकण्यात आले होते. मात्र काल रात्रो झालेल्या वादळी वा-यामुळे पेंटाल कोसळला. त्यामुळे शेकडो यात्रेकरुंसमोर निवा-याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. ही बाब आमदार किशोर जोरगेवार यांच्या लक्षात येताच त्यांनी अब्दुल कादर यांच्या सहकार्याने याच परिसरात असलेल्या जामा मस्जिद पब्लिक ट्रस्ट च्या पदाधिकार्यांशी दुरध्वनी वरुन संपर्क साधत शेरेतुल इस्लाम मदरसा येथे यात्रेकरुंना आश्रय देण्याची विनंती केली. मदरसा कमेटीनेही यावर तात्कार होकार देत मदरसेची दारे यात्रेकरुंसाठी खुली केली.

त्यामुळे माता महाकालीच्या दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांच्या येथे निवा-याची सोय झाली आहे. मदरसा कमेटी सदर भाविकांना सोयी सुविधा पुरवत असून हिंदू मुस्लिम ऐक्याचा संदेश देशाला देत आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनीही जामा मस्जिद पब्लिक ट्रस्ट ने घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांचे आभार मानले आहे. सोबतच मंदिर परिसरातील मंगल कार्यालये आणि सभागृह यात्रेकरुंसाठी मोकळे करुन तेथे यात्रेकरुंच्या निवासाची सोय करण्याच्या सुचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा आणि मनपा आयुक्त विपिन पालिवाल यांना केल्या आहे. या पूर्वी चंद्रपुरात आलेल्या पुरामुळे प्रभावित झालेल्या नागरिकांसाठी किदवाई हायस्कूल खुली करण्याच्या विनंतीचा किदवाई कमेटीच्या वतीने सन्मान करत पूरग्रस्तांसाठी शाळा खुली केली होती.



# नितीन देशमुख मित्रमंडळाचा सहा वर्षांपासून 'दानापाणी, एक घास चिऊसाठी'

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** येथील नितीन देशमुख (बंटी भाऊ) मित्र मंडळ यांचा गेल्या सहा वर्षांपासून दाना पाणी एक घास चिऊ साठी हा उपक्रम राबवण्यात येतो. आज या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सुमारे शंभर ठिकाणावर मातीची भांडी बसवण्यात आली. करमाड, ता. छत्रपती संभाजीनगर पोलिस स्टेशनचे पीआय प्रताप नवघरे साहेब यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. हा उपक्रम नितीन देशमुख मित्र मंडळाचे अध्यक्ष सचिन अवचरमल हे राबवत असतात. या प्रसंगी उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दत्ता भाऊ उकर्डे ,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश आण्णा आघडे, एकनाथराव अवचरमल, बाळासाहेब उकर्डे, सैय्यद कदिर, अशोक तारो, ज्ञानेश्वर उकर्डे, शकील पठाण, साळुबा कुलकर्णी, आकाश कुलकर्णी, मझिदखा पठाण, उत्तम आंबीलढगे, कोळकर सर, प्राचार्य सुरेश जाधव सर, विलास उकर्डे, श्रीराम तारो सर, बाळासाहेब पवार सर, पाटील सर, राहुल कुलकर्णी, डॉक्टर बलांडे साहेब वैदकिय अधिकारी डॉक्टर विश्वास वाघमारे, श्रीमती डॉक्टर पौर्णिमा पंडित, मनीषा आढाव, जयश्री अंभोरे, माया सुतार,अजित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# उघडा मारुती देवस्थानकडून हनुमान जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** खेड बुद्रुक -निंबोडी शिवेवर उघडा मारुती देवस्थानकडून हनुमान जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. खेड बुद्रुक निंबोडी शिवेवरील पंचक्रोशीतील लोकांसाठी हे जागृत देवस्थान मानले जाते.हनुमान जयंतीचे औचित्य साधून विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आले. प्रथमतः पहाटे पाच वाजता ह. भ. प. श्री हरी महाराज गोपनर यांचे सुश्राव्य कीर्तन घेण्यात आले. सूर्योदयाला पुष्पवृष्टी झाल्यानंतर महारती संपन्न करण्यात आली.अन्नदाते महादेव शेळके (पंदारकर) गणेश दत्तात्रय शेळके यांनी महाप्रसादाचे विशेष नियोजन केले होते. डेकोरेशन मंडप प्रमोद धुमाळ यांनी केले होते. काही दिवसांपूर्वी उघडा मारुती देवस्थानसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव साहेब यांच्या विशेष प्रयत्नातून उघडा मारुती देवस्थानसाठी पाच लाख रुपये निधी सभा मंडप व जीर्णोद्धारासाठी उपलब्ध करण्यात आला होता.

त्यामुळे महिला भगिनी व भावीक भक्तांचे उन्हापासून चांगले संरक्षण झाले सर्व भाविक भक्तांनी शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव साहेब यांचे सुद्धा विशेष आभार मानले.

तसेच या कार्यक्रमासाठी शिवसेना खंडाळा तालुकाप्रमुख भूषण शिंदे,ग्रामपंचायत सदस्य पळशी नवनाथ भरगुडे पाटील तसेच सदामहाराज ठोंबरे, खेड बुद्रुक सरपंच, सदस्य, निंबोडी, सरपंच, सदस्य, पंचक्रोशीतील भाविक भक्त, सभासद मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्याची 7,80,000 रोख रक्कम चोरी

## सपोनि बारवाल यांनी आवळल्या आरोपीच्या मुसक्या

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** पोलीस ठाणे सोयगाव येथे तक्रारदार नामे आत्मराम मनिराम गायकवाड वय 45 वर्षे रा. कंकराळा ता. सोयगाव यांनी फिर्याद दिली कि, दिनांक 14/04/2024 रोजी दुपारी 14:00 वाजेनंतर कामानिमित्ताने त्यांचे शेतात गेले असताना. त्यांचे कंकराळा येथील राहते घराचे कडी-कोंडा व कुलप तोडुन अज्ञात व्यक्तींने त्यांचे लोखंडी कपाट फोडुन त्यामध्ये त्यांनी टरबुज विक्रीतुन मिळालेले 7,80,000/- रोख रक्कम ठेवलेली अज्ञात व्यक्तींने लबाडीचे ईरादयाने चोरून घेवुन पसार झाला होता. यावरुन पोलीस ठाणे सोयगाव येथे कलम 454, 380 भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.शेतक-याचे घरातील शेतमाल विक्रीतुन मिळालेल्या हंगामाच्या उत्पन्नाची मोठी रक्कम चोरी झाल्यामुळे, नमुद घटना मा. मनिष कलवानिया पोलीस अधीक्षक यांनी अत्यंत गार्भिंयाने घेवुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करण्याचे सचुना स्थानिक गुन्हे शाखा यांना दिले होते. कंकराळा ता. सोयगाव हे अत्यंत कमी लोकवस्तीचे गाव असल्याने दुपारच्या वेळेस गावामध्ये अत्यंत कमी नागरिकाची वर्दळ त्यातही घरफोडी झाली तो परिसर दुपारी निर्मनुष्य असल्याने तसेच घटनास्थळी चोरी बाबत आरोपीचा कोणताही सुगावा देणारी खुन मिळुन येत नसल्याने गुन्हयांचा तपास करण्याचे आव्हान हे पोलीसांपुढे होते. भौतिक पुरावा उपलब्ध होत नसल्याने स्था.गु.शा चे घरफोडी विरोधी पथकाचे पो.उप.नि. विजय जाधव व त्यांचे पथकाने वेशांतर करून कंकराळा गावात मुक्काम ठोकला.

या परिसरातील शेळया व जनावरे चारणा-या तसेच गावात खेळाणा-या मुलांना विश्वासात घेवुन गावामध्ये बाहेरील कोणी अनोळखी व्यक्ती आला होता का याबाबत कसोशिने माहिती गोळा करणे सुरू केले. घरफोडी विरोधी पथकांने गावात येणारे बाहेरील सामान विक्रेते (फेरिवाले), फिरस्ती लोक, पालात राहणारे, यांचेसह शेजारील पाचोरा,जामनेर, जळगाव भागातील सराईत गुन्हेगार यांची पडताळणी केली होती.यादरम्यान अटल घरफोडया असलेल्या प्रविण सुभाष पाटील रा. बिलवाडी ता.जि. जळगाव याबाबत पथकाला अधिक संशय बळावल्याने पथकाने संशयीत प्रविण पाटील याचा फोटो हा कंकराळा गावातील मुलांना दाखवुन सदर व्यक्ती गावात आला होता का याबाबत माहिती घेतली असता संशयीत व्यक्ती हा गावात फिरत असल्याबाबत मुलांनी त्याचे फोटोद्वारे ओळखल्याने पथकाने लागलीच संशयीत आरोपी प्रविण पाटील याच्या बिलवाडी येथील घरी सापळा लावला असता आरोपी हा घरात असल्याची खात्री झाल्यानंतर तो बेसावध असतांना पथकाने त्याचेवर अचानक झडप घालुन त्यास शिताफिने ताब्यात घेतले.

गुन्हयाचे अनुषंगाने त्यास विचारपुस करता तो पोलीसांना उडवा-उडवीचे उत्तरे देवु लागल्याने त्याचेवर संशय बळावल्याने त्यास विश्वासात घेवुन कसुन चौकशी करता त्याने नमुद घराची घरफोडी केली असल्याचे त्यांने कबुल केल्याने नमुद गुन्हयात आरोपी नामे प्रविण सुभाष पाटील वय 30 वर्षे रा. बिलवाडी ता.जि. जळगाव याला नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यांने कंकराळा येथुन शेतक-याचे घरातुन चोरी केलेला रक्कमे पैकी 6,50,000/- रूपये रोख रक्कम जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.

याचप्रमाणे सदर आरोपी हा बंद व कुलूप लावलेल्या घरांची रेकी करून असे घरे दिवसा फोडण्याच्या सवयीचा असल्याचे यावेळी निष्पन्न झाले असुन त्याने सोयगाव तालुक्यात 06 ठिकाणी घरफोडया केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पुढील तपास सोयगाव पोलीस करित आहे.

फिर्यादी शेतक-याची कबाड कष्टाची व संपुर्ण हंगामची चोरी गेलेली रक्कम ही अवघ्या काही दिवसात त्याला परत मिळाल्याने त्याने सोयगाव पोलीसांच आभार मानले आहे.नमूद कारवाई ही सपोनि पकंज बारवाल, सपोनि. सोयगाव, स्थागुशाचे विजय जाधव, पो.उप. नि.दगडु जाधव, श्रेणी पो.उप.नि. पोलीस अंमलदार विठ्ठल डोके, गोपाल पाटील, शेख कासम, राहुल गायकवाड, योगेश तरमळे यांनी केली आहे.



# नारायण कुडलीकर लिखित ओझे सुखदुःखाचे पुस्तकाचे डॉ. मुलाटे यांच्या हस्ते प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** उजळंबकर वाचनालय एन४ सिडको छत्रपती संभाजीनगर येथे ओझे सुखदुःखाचे नारायण कुडलीकर लिखित पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ.वासुदेवराव मुलाटे यांचे हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी डॉ वि.ल.धारूरकर, श्री उत्तमराव झाल्टे ,डॉ शिवाजीराव धनवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. .प्रकाशन कार्यक्रमास डॉ. मुरहरी केळे, अनील भालेराव, सानप, एन.बी. जगताप अशी साहित्य, सामाजिक, अभियांत्रिकी क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. वाचनालयाचा हॉल उपस्थित रसिकांनी खचाखच भरला होता. प्रकाशन कार्यक्रमाचे संचलन लेखकाच्या स्नुषा सौ.वर्षा पराग कुडलीकर यांनी केले. .अध्यक्ष आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय लेखकाच्या जेष्ठ स्नुषा सौ.अनुराधा किरण कुडलीकर यांनी केले. .आभार प्रदर्शन सौ.वर्षा कुडलीकर यांनी केले. पुस्तक खरेदीस रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला. अध्यक्ष आणि पाहुण्यांनी एक चांगली साहित्यकृतीं असा "ओझे सुखदुःखाचे ' या ललित लेखाच्या पुस्तकाचा गौरव केला.

# सावळदबारा येथे प्रशांत फुसे शाखाधिकारी रुजू : प्रा.जीवन कोलते यांनी केले स्वागत

आधुनिक केसरी न्यूज


**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक ला 3 वर्षांपूर्वी ग्रामीण भाग म्हणून बँक मॅनेजर पदावर मयूर सोनटक्के यांची नियुक्ती झाली होती आज दि.२३/४/२४ एप्रिलला त्याच्या कार्यकिर्द ला 3 वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्याची बदली झाली असून त्यांच्या जागेवर आता शाखाधिकारी प्रशांत फुसे अभंयीचे हे रजू झाले आहे. शाखाधिकारी प्रशांत फुसे हे महाराष्ट्र ग्रामीण अभंयी शाखेला तिथून त्यांची आता सावळदबारा येथे शाखाधिकारी पदी रुजू झाले आहे.

त्यांना सावळदबारा येथील त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा पदभार स्वीकारला,प्रा जीवन कोलते पाटील यांच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन मोठा सत्कार करण्यात आला व या नंतर शाखाधिकारी प्रशांत फुसे हे बघणार आहे. याप्रसंगी आफिसर काशीनाथ वावरे,कॅशीअर शिवा जैस्वाल, शिपाई राम जोशी हे उपस्थित होते. वर्षात या गावाला व परिसरातील डाभा,मोलखेडा, हिवरी, चारुतांडा जामठी घाणेगाव तांडा नांदा, सावळदबारासह गावाला आपले मानून घेणार.जमे पर्यंत कोणाचेही काम रुकु देणार नाही आणि जास्तीत जास्त युवकांना मार्गदर्शन करेल व ज्यांना गरज आहे त्यांना प्रांतप्रधान यांची मुद्रा योजना देऊन सहकार्य करुन कर्ज उपलब्ध करून देईल असे मत शाखाधिकारी प्रशांत फुसे यांनी व्यक्त केले, अशी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे आफिसर काशीनाथ वावरे यांनी बोलताना दिली.



# नरेंद्र मोदींची २८ एप्रिलला कोल्हापुरात जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज



**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी जोरदार सुरू असून, राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सभा घेतल्या जात आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्याचे मतदान झाल्यानंतर आता महाराष्ट्रातील ज्या लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे, अशा मतदारसंघात आता लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे. कोल्हापूर जिल्हयातील दोन्ही लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुका दुसऱ्या टप्प्यात पार पडणार असून, कोल्हापूर लोकसभा महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार प्रा.संजय मंडलिक आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघ महायुतीचे शिवसेना उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा २८ एप्रिल रोजी तपोवन मैदान, कोल्हापूर येथे होणार आहे, ही माहिती राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी दिली आहे. या सभेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह केंद्र व राज्य सरकार मधील इतर मंत्री उपस्थित राहणार आहे. त्यामुळे दि.२८ रोजी कोल्हापुरात महायुतीचे भगवे वादळ घोंगावणार असल्याचे सांगितले.

# बाजार सावंगी येथील बाजारपेठेत काठ्यांवर चालण्याची भर उन्हात कसरत

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील श्री रेणुका देवीची यात्रा चैत्र शुद्ध पौर्णिमेपासून भरत असली तरी मुलांसाठी पाळणे खेळणी झोके व बहुरूपी व्यावसायिकांचे आगमन पंचमी महोत्सवाला झाले असून त्यांनी व्यवसाय सुद्धा सुरू केला आहे. गुरुवारी (ताः१८) भर दुपारी उन्हात एक वाजेच्या दरम्यान बहुरूपी कलाकाराने व साक्षीदाराने ढोल वाजवीत गावातील रस्ते व बाजारपेठेतून दोन बांबूच्या काठ्यांवर चालत गावात फेरी मारून काठ्यांवरच्या विविध कसरती खाली झुकणे नमस्कार करणे हात जोडणे मदत मागणे असे प्रयोग व हालचालीचे कसरत करत दुकानात दुकानात भिक्षा मागत उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदतीच्या व दयेची मागणी केली. कौटुंबिक परंपरेने चालत आलेल्या बहुरूपी कलेद्वारे जनतेचे मनोरंजन करताना बहुरूपी कलेची सादरीकरण याद्वारे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचा त्यांचा निर्धार आहे. त्यांना नाव विचारले असता काहीही न सांगता एक कलाकार आपल्या कौटुंबिक जीवनासाठी ही कसरत करणे व्यवसाय मानतो एवढेच काय नावात काय आहे मला आर्थिक मदतीची गरज आहे आणि की मी भागवण्यासाठी ऊन पाऊस वारा यांची परवा न करता माझे व्यावसायिक जीवन जगत आहे त्यातच मी समाधानी आहे कुटुंबातील व्यक्ती ही खेळणी पाळणे व्यवसायातून कमाईचे ध्येय आहे.






# केशव व्यंकटेश चाफेकर क्रीडागृहात आग

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाचे केशव व्यंकटेश चाफेकर क्रीडागृहात आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी पंधरा मिनिटांत आग आटोक्यात आणली.

केशव व्यंकटेश चाफेकर क्रीडागृहात खेळाचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी आग लागली होती. धूर मोठ्या प्रमाणात झाला. जवानांनी तातडीने आगीवर पाण्याचा मारा सुरू करत आग सुमारे पंधरा मिनिटांत आटोक्यात आणली. खेळाडू आणि शिक्षक यांच्याशी संवाद साधत सर्वजण सुरक्षित असल्याची खात्री केली. यावेळी उपस्थित खेळाडू, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अग्निशमन दलाच्या जवानांचे आभार मानले.

आगीत गाद्या, फोम, इलेक्ट्रिक वायर, संगणक, सीसीटीव्ही आणि कार्यालयातील अन्य वस्तूंचे नुकसान झाले. जिमनास्टिकचे साहित्य जळाले होते. आग इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे लागल्याची शक्यता असून या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

अग्निशमन दलाचे सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी रमेश गांगड, सुनिल नाईकनवरे हनुमंत कोळी, शुभम करांडे, निलेश कदम तसेच जवान विनायक माळी, जितेंद्र कुंभार, अतुल खोपडे, आदींनी आग आटोक्यात आणली.

# शासकीय अनुदानित आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना समाजात मानाचे स्थन प्राप्त व्हावे, तसेच त्यांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिने आदिवासी विभाग नियमित प्रयत्नशील असतो. त्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत या शैक्षणिक सत्रात 23 एप्रिल ते 22 मे 2024 या कालावधीत उन्हाळी शिबीर हा उपक्रम राबविला जात आहे. प्रकल्पात पहिल्यादांच अशा उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर उपक्रमाचे आयोजन शासकीय माध्यमिक तथा उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा, बोर्डा ता. जि. चंद्रपूर येथे करण्यात येत आहे. उन्हाळी शिबिरात शासकीय /अनुदानित आश्रम शाळेतील एकूण 150 विदयार्थी (75 मुले व 75 मुली ) सहभागी होणार आहेत. या शिबिराकरीता विद्यार्थ्यांच्या निवासाची, भोजनाची व प्रशिक्षणाची मोफत सोय करण्यात येणार आहे.



शिबिरात घेण्यात येणारे उपक्रम : 1. योगा प्रशिक्षण 2. आर्चरी प्रशिक्षण 3. गोंडी पेटींग प्रशिक्षण 4. तायक्वांडो प्रशिक्षण 5. व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण 6. इंग्लिश स्पीकिंग कोर्स 7. संगीत कला प्रशिक्षण. या उपक्रमाचे पालकांकडून स्वागत करण्यात आले असून या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची उन्हाळी सुट्टीत शिक्षणाची नाळ जुळून राहण्यास मदत होणार आहे. शिबिरात प्रशिक्षित प्रशिक्षकामार्फत वरील सर्व उपक्रमाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होणार आहे, त्यामुळे भविष्यात स्वतः च्या पायावर उभे राहण्याकरीता सदर प्रशिक्षण हे उपयोगी पडणार आहे. प्रकल्पात पहिल्यांदाच अशा प्रकारचा उपक्रम राबविला जात असल्यामुळे सर्व विद्यार्थी उत्सुक आहेत. शिबिरादरम्यान प्रकल्प कार्यालयातील विविध अधिकारी प्रशिक्षण स्थळी भेट देतील, अशा प्रकारचे नियोजन करण्यात आल्याचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी कळविले आहे.



# डॉ. उज्ज्वला दहिफळे यांनी घेतली आयएमए अध्यक्षपदाची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** इंडियन मेडिकल असोशिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेची निवडणूक प्रक्रिया नुकतीच पार पडली. काल दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी २०२४-२५ या वर्षासाठी डॉ उज्वला दहिफळे यांनी अध्यक्ष म्हणून शपथ घेतली. डॉ. शिवकुमार उत्तुरे (उपाध्यक्ष, राष्ट्रीय आय एम ए ), डॉ जयेश लेले (चेअरमन, राष्ट्रीय आरोग्य योजना), हे केंद्रातील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच शहर शाखेचे माजी अध्यक्ष डॉ देवदत्त पळणिटकर, डॉ. संजीव सावजी, डॉ. मुर्तुझा शेख, डॉ. संतोष रंजलकर, डॉ. सुभाष श्रॉफ, डॉ. जितेन कुलकर्णी, डॉ. उन्मेष टाकळकर , डॉ. संजीव इंदूरकर,डॉ. सत्यनारायण सोमाणी, डॉ. सचिन फडणीस, डॉ. कुलदीप सिंग राऊळ डॉ. कानन येळीकर या मान्यवरांकडून नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ उज्वला यांचे मेडालियन देऊन स्वागतकरण्यात आले. या वेळी सचिव म्हणून डॉ. विकास देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. प्रफुल जटाळे , उपाध्यक्ष महिला डॉ रेणु बोराळकर, उपाध्यक्ष पुरुष डॉ केदार साने, सहसचिव प्रशासकीय डॉ. अर्चना साने, सहसचिव, क्लिनिकल डॉ अक्षय मारावार , सहसचिव सांस्कृतिक डॉ. प्रशांत देशपांडे, सहसचिव क्रीडा डॉ. वंदना काबरा यांनी शपथ घेतील तर डॉ. उज्वला झवर, डॉ. सोनाली सावजी , डॉ. संतोष तोतला, डॉ. कांचन रोपळेकर, डॉ. मंगेश तांदळे, डॉ. रवींद्र झवर, डॉ इशरत बारूदवाला यांनी वेगवेगळ्या सब कमिट्यांच्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या.

या वर्षी आय एम ए च्या फ्री ओ पि डी च्या माध्यमातून सायंकाळी ४ ते ६ या वेळेत नागरिकांना मोफत आरोग्य सेवा दिली जाणार आहे. नवीन ६ गावे दत्तक घेत त्या गावातील महिला , किशोरवयीन मुलींचे आरोग्य,महिलांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती, अनेमिया, उच्च रक्तदाब,हाडांची ठिसूळता तसेच वृद्धांचे आरोग्य याकडे विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगतले. शहरातील मेडिकल कॉलेज चे विद्यार्थी आय एम ए सोबत जोडून रिसर्च आणि एजुकेजनल ट्रेनिंग देण्याचा मांस हि त्यांनी बोलून दाखवला तसेच डॉक्टरांचा टास्क फोर्स तयार करून तो शहरातील डॉक्टरांना मारहाणी प्रसंगी त्यांना मदत करेल. समाज हित व आरोग्य तसेच वैदयकिय व्यावसायिकांच्या विविध अडचणीं सोडविण्यासाठी हि आम्ही काम करू असल्याचे अध्यक्षा डॉ उज्वला दहिफळे म्हणाल्या.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित सभासदांसाठी आयएमएच्या विविध डॉक्टरांनी सुश्राव्य हिंदी व मराठी गीतांचा कार्यक्रम कल्चरल सेक्रेटरी डॉ प्रशांत देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला.

कार्यक्रमाचे सूत्र संचलन डॉ. संगीता देशपांडे आणि डॉ सोनाली सावजी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रफुल जटाळे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वच पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली असल्याचे सचिव डॉ विकास देशमुख यांनी सांगितले.

# भगवान महावीरांच्या विचारात विश्वाचे कल्याण

## उपाध्याय प पू प्रवीण ऋषीजी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सत्ता आणि शास्त्राच्या आधारे विजय मिळवणारे जगात खूप देश आहेत, परंतु भगवान महावीर हे असे नाव आहे ज्यांनी सत्याच्या आधारे विजय मिळवला. त्यामुळे ते सर्वांपेक्षा खूप अनोखे आणि वेगळे आहेत. सर्व धर्म आम्ही श्रेष्ठ असल्याचा दिंडोरा पिटतात, त्यातूनच विश्वाचे कल्याण आहे असे संदेश देतात, परंतु या विचारांना शेवटपर्यंत पोहोचवणारे भगवान महावीरच आहे. विवेकच धर्म आहे आणि त्यातूनच विश्वकल्याण आहे. विवेक हाच धर्म असून ही प्रस्तुती तात्पुरती न घेता निरंतर घडली पाहिजे. महाविरानी आपल्याला भोजनातूनही अहिंसा शिकवली आहे, कर्तव्य आज एक उद्या वेगळे आहेत त्यामुळे निरंतर कार्य महत्त्वाचे. जगासमोर महावीर पर्याय म्हणून पुढे येऊ देऊ नका, महावीरांचे विचार हे एका दिवसासाठी नसून ते 365 दिवस निरंतर चालणारे आहेत.
यावेळी महाराजांनी हिंदी विवेक मासिक पत्रिकेचे तोंड भरून कौतुक केले व भगवान महावीरांचे विचार एका दिवसापुरते सीमित न राहता निरंतर वेळोवेळी जगासमोर आणण्याचे आवाहन केले. महावीरांचे दिव्य दृष्टिकोन जगासमोर पोहोचले पाहिजेत यासाठी हिंदी विवेकने आपले कार्य चालू ठेवावे, असे सांगितले.
तीर्थंकर भगवान महावीर यांच्या 2550 व्या निर्वाण वर्षानिमित्त हिंदी विवेक प्रकाशित 'तीर्थंकर भगवान महावीर' विशेषांकाचे प्रकाशन पुणे येथील गोयल गार्डन येथे मोठ्या उत्साहात पार पडले. भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक दिनाचे औचित्य साधून या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात जैन मुनि यांनी महावीर वंदनेने केली. यावेळी कार्यक्रमाला उपाध्याय प. पू. प्रवीण ऋषि जी महाराज, रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री रमेश पतंगे, सुहाना प्रवीण मसालेवाले चे डायरेक्टर विशालकुमार चोरडिया, पोपटलाल ओसवाल, राजेंद्र बाठिया तसेच जैन समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. दरम्यान हिंदी विवेकचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल पेडणेकर यांच्या हस्ते उपाध्यय प. पू. प्रवीण ऋषि महाराज यांना पुस्तक साहित्य भेट देऊन सत्कार करण्यात आला.
यावेळी बोलताना सुनील आंबेकर म्हणाले, हिंदी विवेक विचार प्रबोधनाचे माध्यम आहे. कित्येक विषयांचे अचूक अध्ययन करून सतत विवेकच्या माध्यमातून समाजासमोर वेगळे विषय ठेवले जातात. आजचा दिवस सर्वांसाठी खूप महत्त्वाचा आहे, 2550 वर्षानंतरही या दिवसाची महानता लक्षात येते. शेकडो वर्षांपूर्वी दिलेले विचार आजही जिवंत आहेत येणाऱ्या समस्यांचे समाधान हवे असेल तर महावीरांच्या विचारांवर चालले पाहिजे. मानव कल्याणासाठी केलेली तपस्या जन्मोजन्मातर ची साधना त्यातून या मार्गांचे निर्माण झाले आहे. राष्ट्राची साधना हजारो वर्षांची आहे. विदेशींच्या आक्रमणात संत महात्म्यांनी आपल्या विचारातून राष्ट्राला मजबूत बनवले. आपल्या पूर्वजांनी मानव कल्याणच्या या विचारांवर विश्वास ठेवून विदेशी संकटांपासून राष्ट्राला वाचवले. संघर्ष काळात राष्ट्राच्या जीवन मूल्यांना आत्मसात केले या मूल्यांना आत्मसात केल्यानेच व्यक्ती चरित्रवान होतो. एकता, संस्कृती, महत्त्वाची. भौतिक



सांस्कृतिक संपन्नता महत्वाची. अशा या कार्यात आपण सहभागी होऊन याच मार्गावर चालावे असे आवाहन त्यांनी केले. संतांचे वचन विचार विवेकने परिश्रमाने सर्वांसमोर ठेवले त्याबद्दल आंबेकर यांनी विवेक मासिक पत्रिकेच्या परिवाराचे अभिनंदन केले.
प्रमुख पाहुणे, वरिष्ठ लेखक पद्मश्री रमेश पतंगे यांनी जैन समाजाचे महत्व सांगितले. प्रत्येक देशाचे एक वेगळी ओळख असते अमेरिका भौतिक साधन संपन्न देश आहे, ब्रिटनला मदर पार्लमेंट म्हणतात अशाच प्रकारे भारताला मात्र धर्मभूमी म्हणून ओळखली जाते. ती टिकवून ठेवण्यासाठी संत महात्म्यांनी मोठे योगदान दिले. वेद काळापासून आजपर्यंत धर्मभूमी बनवून ठेवण्यात महावीरांचे कार्य अग्रणी आहे. राष्ट्रीय व्यक्तित्व बनवण्यासाठी महापुरुषांचे योगदान मोठे आहे. यावेळी पद्मश्री पतंगे यांनी भगवान महावीरांच्या विचारांवर चालणाऱ्या अहिंसा विचाराचे महत्व विशद केले. संविधानातील आर्टिकल 21 आपल्याला कशा प्रकारे महत्त्वपूर्ण आहे हे सांगितले. कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय कोणाचीही हत्या करता येत नाही. प्रत्येकाने अहिंसेचे पालन केले पाहिजे हे भगवान महावीरांचे विचार आजही संविधानाच्या माध्यमातून आपल्या समोर आहेत.
विशालकुमार चोरडीया यांनी आपल्या संक्षिप्त भाषणात भगवान महावीरांना वंदन करून शुभेच्छा दिल्या. भगवान महावीरांचे विचार समजून घेतले पाहिजे तरच सुख शांतीची प्राप्ती होईल. महावीरांचे विचार आपल्याला योग्य मार्ग दाखवतील महावीरांनी सम्यक दृष्टिकोनातून आध्यात्मिक लाभ दिले त्यामुळे आपले जीवन समर्थ आहे. चोरडिया परिवार महावीरांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपले योगदान देईल. अशा विशेषांकाच्या माध्यमातून समाजभिमुख कामाचे फलस्वरूप सांगताना हिंदी विवेक टीमचे त्यांनी कौतुक केले.
यावेळी उपस्थित मान्यवर सुनील आंबेकर, विशालकुमार चोरडिया, पोपटलाल ओसवाल, राजेंद्र बाठिया तसेच सुजय शाह, परेश शाह, अनिल नाहर, राजेंद्र बाठिया, प्रकाश धोका, वर्धमान शाह यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विशेषांकाच्या यशस्वीतेसाठी सहयोग देणारे प्रतिनिधि डॉ. दिलीप कुलकर्णी यांनाही गौरविण्यात आले.
हिंदी विवेकच्या मागील 14 वर्षांतील यशस्वीतेबद्दल बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल पेडणेकर यांनी आपल्या प्रास्ताविकेत वाचक, हितचिंतक, जाहिरातदार यांच्या बहुमोल सहभागाबद्दल आभार व्यक्त केले. उपाध्याय प पू प्रवीण ऋषी महाराज जी यांच्या सानिध्यात विमोचन कार्यक्रम ही अभिमानाची गोष्ट आहे. देशात निवडणुकीचे वातावरण असताना इथे मात्र समाज परिवर्तनाचा विचार सर्वांसमोर मांडण्याचा प्रयत्न होत आहे, हे महत्त्वाचे. समाज परिवर्तनात महाराजांचे मोठे योगदान आहे त्यांनी उचललेला परिवर्तनाचा विडा अखंड समाजाला एकजूट ठेवतो. जो व्यक्ती स्वतः पोहतो तो दुसऱ्यालाही वाचवू शकतो, अशाप्रकारे दुसऱ्याची समस्या सोडवता येते, असे उपाध्याय प्रवीण ऋषी महाराजांचे विचार आहेत. भगवान महावीरांच्या कार्याकडे पाहिले तर त्यांनी विश्वाच्या हितासाठी साधना केली. त्यांचे विचार विश्वासाठी उपयुक्त ठरतात हे सर्व विचार विशेषांकातून वाचका पर्यंत पोहोचविण्याचे कार्य हिंदी विवेक मासिक पत्रिकेने केले आहे असे म्हणाले.  हिंदी विवेक ग्रंथ, विशेषांक, पुस्तक आदीच्या माध्यमातून राष्ट्र विचारांचे बीज वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करीत आहे. प्रत्येक समाज तसेच विस्मृत होत चाललेल्या महत्वपूर्ण साहित्याला पुन्हा झळाळी देण्याचे काम हिंदी विवेक उत्तरोत्तर करीत राहील, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक हिंदी विवेकच्या कार्यकारी सम्पादक पल्लवी अनवेकर यांनी केले. आभार प्रशांत मानकुमरे यांनी मानले.



# केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेंच्या उपस्थितीत शेकडो काँग्रेस कार्यकर्ते भाजपमध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** आगामी लोकसभा निवडणूक जालना मतदारसंघ 2024 च्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्ववार विश्वास ठेवून केंद्रीय राज्य रेल्वेमंत्री नामदार रावसाहेब पाटील दानवे यांच्या उपस्थितीत अंबड येथील महात्मा फुले चौकात झालेल्या पक्ष प्रवेश सोहळा कार्यक्रमात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह शेकडा कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यामध्ये अंबड काँग्रेसचे तालुका अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष केदार दादा कुलकर्णी यांच्यासह द्वारकदास देवीदास पाटील, सोहेल चाऊस, खुशालराव उडावंत, आरेफ डावरगावकर, खुर्शीद भाई जिलानी, शेख शकील, एकनाथराव साखरे, रामभाऊ बेवले, विजू मामा चुगडे, खाजा भाई, बंडू जाधव, शोभाबाई,जाधव, रमेशशेठ भवर, सचिन खरात, मुसताक भाई,संभाजी गुडे, दीपक लोहकरे, रिजवण डावरगावकर, रवी डोंगरे, गौरी ताई कुलकर्णी, राधाबाई राऊत, क्रांती राऊत, संकेत वाघमारे, विवेक गिलडा, डॉ. गोपाल गायकवाड, सुभाष गायकवाड, बाबराजे शिंदे, योगेश राऊत, अक्लेश आव्हाने  यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.  यावेळी आ. नारायण कुचे,भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, उपाध्यक्ष दीपकसिंह ठाकूर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अवधूत नाना खडके, सिद्धिविनायक मुळे, अरुण भाऊ उपाध्ये, देवीदास कुचे,औदुंबर बागडे, डॉ.राजेंद्र ठोसर,रमेश पैठणे, जितेंद्र पालकर,रमेश शहाणे, प्रदीप पवार, श्रीराम नागरे सर, तारेख चाऊस,डॉ.नंदकिशोर पिंगळे, संदीप आंधळे, सुरेश गुडे, इंदुमती ताई घुगे, फेरोज शेख,संदीप खरात, सौरभ कुलकर्णी, बाळू खरात, बाळासाहेब तायडे,ओमप्रकाश उबाळे, राजू सावंत, सुनील खाणचांदणी, विठ्ठलसिंह राणा, द्वारकदास जाधव,बाबनभाऊ बुंदेलखंडे, नासिर बागवान, विष्णू पुंड, बाबूराव मामा खरात, अंबादास जाधव, सत्यभान दादा खरात, बाळू शहाणे, रोहिदास मासोले, लक्ष्मण पेदे, सचिन जाधव, रमेश बुंदेलखंडे, गणपत मामा भोजने, नंदकिशोर पाटील, डॉ.साईनाथ उकार्डे, भगवान भोजने, संजय राठोड, पांडुरंग शिंदे यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी तथा कार्यकर्ते व अंबड  शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयपीएलवर कोट्यवधींचा ऑनलाईन सट्टा!

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** मागील पाच ते सात वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यातील काही शहर अवैध सट्टेबाजार चालवणाऱ्यांच्या विळख्यात सापडली असून या माध्यमातून दरवर्षी 'आयपीएल'वर कोट्यवधीची उलाढाल होत असल्याचे चित्र आहे. दोन वर्षांपूर्वी अहेरी पोलिसांनी कारवाई केली होती. पण त्यानंतरदेखील परिस्थिती 'जैसे थे' असल्याने नोकरदार वर्ग आणि युवकांचे भविष्य धोक्यात आले आहे. सुरवातीला चंद्रपूरमधून हा सट्टा चालविला जात होता. पण पोलिसांच्या दणक्याने काही 'बुकिंनी' तेलंगणा सीमाभाग गडचिरोलीतील अहेरी, आलापल्ली, देसाईगंज शहरांना लक्ष्य केले आहे. त्यांनी या भागातील महत्वाच्या शहरांत 'बुकी' नेमले आहेत. कमी कालावधीत लाखो कमविण्याच्या लालसेने अनेक तरुण ऑनलाईन जुगाराच्या विळख्यात सापडले आहे. या सट्टाबाजाराचे लोण जिल्ह्यातील देसाईगंज, गडचिरोली, अहेरी, आलापल्ली परिसरात पसरले आहे. सध्या 'आयपीएल'चा हंगाम असल्याने क्रिकेटवर मोठ्या प्रमाणात ऑनलाईन सट्टा लावल्या जात आहे. हा सट्टा पूर्वी चंद्रपुरातून नियंत्रित केल्या जात होता परंतु आता याचे केंद्र तेलंगणा सीमाभागात हलविण्यात आले आहे. मोठ्या बुकिंनी गावागावात काही व्यक्ती नियुक्त केले आहे. ते सट्टा खेळणाऱ्याला ऑनलाईन लिंक पुरवितो. यामाध्यमातून प्रत्येक सामन्यावर लाखो रुपयांचा सट्टा लावल्या जात असल्याचे चित्र आहे. मागील वर्षी अहेरी पोलिसांनी काही आरोपींना अटक केली होती. परंतु कारवाईनंतरही सट्टा सुरूच असल्याने अनेक तरुण व नोकरदार वर्ग या जुगाराच्या आहारी गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे झटपट श्रीमंत होण्याचा नादात अनेकांवर कर्जबाजारी होऊन फिरण्याची वेळ येत आहे. तर सट्टा चालविणारे अल्पावधीतच कोट्यधीश झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे या सट्टेबाजांना आवर घालण्यात यावे अशी मागणी सर्वसामान्यातून होत आहे. दोन वर्षांपूर्वी तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी ऑनलाईन सट्टा चालविणाऱ्यांचे 'रॅकेट' उध्वस्त केले होते. पण त्या कारवाईत मुख्य सूत्रधाराला सोडून लहान बुकिंवर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मनीषनगर उड्डाणपुलाची 'लँडिंग' धोकादायक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वर्धा मार्गावरील डबलडेकर उड्डाण पुलावरून मनीषनगरकडे जाण्यासाठी बांधलेल्या मनीषनगर उड्डाण पुलाच्या 'लँडिंग'वरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'लँडिंग'च्या अगदी तोंडावरच चौक (महाजन आटा चक्की चौक) असल्याने पुलावरून सुसाट येणाऱ्या वाहनांमुळे चोवीस तास अपघाताची भीती कायम आहे. या चौकात आतापर्यंत बरेच अपघात घडले आहेत. शहरातील उड्डाण पुलामुळे वाहतूक व्यवस्था सुलभ आणि सुरळीत झाली. उड्डाण पुलाच्या निर्मितीमुळे शहरातील अनेक परिसरातील वाहतूक कोंडीवर तोडगा निघाला. मात्र, शहरातील काही उड्डाण पुलाच्या लँडिंगचे नियोजन चुकल्यामुळे मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.

# कॅलिफोर्निया येथे श्री स्वामी समर्थ केंद्राचे लोकार्पण

## अमेरिका आणि कॅनडामध्ये 'विश्वशांती महोत्सवा'स अभूतपूर्व प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्ग आणि त्र्यंबकेश्वर समर्थ गुरुपीठातर्फे "यूएसए आणि कॅनडा विश्वशांती महोत्सव २०२४" चे आयोजन दि. १३ ते २१ एप्रिल २०२४ या कालावधीत परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादानेआणि  नितिनभाऊ मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत  करण्यात आले. जागतिक शांतता नांदावी आणि मानवता धर्म उन्नत व्हावा यासाठी यूएसए आणि कॅनडा मधील लॉस एंजेलिस (कॅलिफोर्निया), कोलंबस (ओहायो), रॅले (नॉर्थ कॅरोलिना), ओरलँडो (फ्लोरिडा), मेम्फिस (टेनेसी), सिएटल (वॉशिंग्टन), बे एरिया (कॅलिफोर्निया), टोरंटो (कॅनडा) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अमेरिकेमधील रहिवासी आणि श्री स्वामी समर्थ महाराजांचे भक्त मोठ्या संख्येने व उत्साहाने उपस्थित होते.

अमेरिका आणि कॅनडा मधील अनेक मान्यवर- स्टेट हाऊसचे प्रतिनिधी, परिषदांचे सदस्य, शिक्षण मंडळाचे प्रतिनिधी, विविध कॉर्पोरेट गटांचे कंट्री हेड, मंदिराचे ट्रस्टी इत्यादींनी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमांना हजेरी लावली. श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या 'देश विदेश अभियान' विभागाने आयोजन केलेल्या या कार्यक्रमांमध्ये सेवा मार्गाच्या बालसंस्कार वर्गातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, स्वामी जप, स्तोत्र-मंत्रांचे पठण, मन:शांती साठी- ध्यान, ढोल ताशाच्या गजरात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांची पालखी मिरवणूक, भारतीय संस्कृती चे स्टॉल्सच्या माध्यमातून प्रदर्शन- असे विविध उपक्रम घेण्यात आले. कार्यक्रमादरम्यान स्वामी भक्तांची स्वयं-शिस्त आणि विदेशात राहून देखील श्री स्वामी समर्थ सेवा मार्गा साठीचे समर्पण हे वाखाणन्याजोगे होते.



कॅनडातून प्रारंभ करून अमेरिकेतील विविध राज्यांमध्ये १० दिवस झालेल्या 'विश्वशांती महोत्सवा' ची सांगता बे एरिया (कॅलिफोर्निया) येथे २१ एप्रिल २०२४ रोजी अभूतपूर्व अश्या सत्संगाने झाली. या समारंभात आदरणीय नितिनभाऊंच्या करकमलाने अमेरिकेतील  श्री स्वामी समर्थ केंद्र ट्रेसी, बे एरिया, कॅलिफोर्निया येथे लोकार्पण करण्यात आले. श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या सातासमुद्रा पार वाटचालीची सुरुवात या ऐतिहासिक अश्या अमेरिकेतील  श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रानी झाली आणि सर्वच मंत्रमुग्ध झाले.

आदरणीय नितिनभाऊंनी स्वामी भक्तांना बहुमुल्य आध्यात्मिक मार्गदर्शन केले नवीन सेवा केंद्रासाठी शुभेच्छा दिल्या. जगभरात सेवा मार्ग करत असलेल्या सामाजिक उपक्रमांबद्दल आदरणीय नितीनभाऊंनी सर्व स्वामी भक्तांना अवगत केले आणि विश्वशांती साठी सेवा मार्गाचा प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन केले. त्याआधी कार्यक्रम स्थळी विश्वशांती यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र मंडळ बे एरिया चे अध्यक्ष भास्कर रानडे, आणि बीएमएम चे वसुधा पटवर्धन व विराज राऊत महोत्सवात आवर्जून उपस्थित होते. महोत्सवाच्या आयोजना साठी विविध संस्थानी हातभार लावला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित भाविकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी विनामूल्य आध्यात्मिक समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले.

सेवा मार्गाच्या आजवरचा अमेरिका आणि कॅनडातील सर्वात मोठा व ऐतिहासिक अश्या या कार्यक्रमात टोरांटो (कॅनडा) येथे श्री. जेफ लाल- संसद सदस्य, कंजर्वेटिव पार्टी, प्रेसिडेंट जेनको कॅनडा इंकारपोरेशन व भारत माता मंदिर ब्रैम्पटन चे संस्थापक ट्रस्टी तसेच मुरलीधर थपलियाल- थपलियाल व राय लॉ फर्म चे संस्थापक व इंडो-कॅनडा चैंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष आवर्जुन उपस्थित होते. लॉस एंजिल्स, कैलिफोर्निया येथे श्री. विजय पाटील- शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय परिवार फाउंडेशन चे अध्यक्ष, श्री. प्रमोद वैटी- अध्यक्ष महाराष्ट्र मंडळ लॉस एंजिल्स, श्री यश जोग- खजिनदार महाराष्ट्र मंडळ लॉस एंजिल्स हे उपस्थित होते. हिंदू सोसायटी ऑफ नॉर्थ कैरोलिना (एचएसएनसी) मंदिरा चे अध्यक्ष श्री. ललित महादेश्वर हे रॅले, नॉर्थ कैरोलिना येथील महोत्सवात भक्तिपूर्वक सहभागी झाले. सर्वच मान्यवरांनी 'श्री स्वामी समर्थ गुरुपीठाने'- यूएसए आणि कॅनडा मध्ये नियमितपणे असे कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती केली.

या कार्यक्रमात बालसंस्कार विभागाच्या विद्यार्थ्यांचे विश्वशांती चा संदेश देण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा दरम्यान श्री स्वामी समर्थ गुरुपीठाच्या माध्यमातून सुरु असलेले उदात्त सामाजिक कार्य, बालसंस्कार, गर्भसंस्कार, शिशू संस्कार, सुजाण पालकत्व, युवाप्रबोधन, वेद-विज्ञान संशोधन, ग्रंथ-साहित्य, आयुर्वेद, वास्तुशास्त्र, पर्यावरण-विज्ञान, भारतीय संस्कृती, विवाह संस्कार इत्यादी विविध सेवा मार्गाच्या स्टॉल्सचा लाभ अनेक भाविकांनी घेतला. महोत्सवात अनेक स्वामी भक्तांनी स्वामींच्या पादुका पूजन करुन आशीर्वाद घेतले.

# महाकाली यात्रेकरुंच्या निवासाची सभागृह, मंगल कार्यालय येथे व्यवस्था करा : जोरगेवार



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाकाली यात्रेसाठी लाखो भाविक चंद्रपूरात दाखल झाले आहे. मात्र येथे वादळी पाउस सुरु असल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत आहे. ही बाब लक्षात घेता मंदिर परिसरातील सभागृह, मंगल कार्यालये यात्रेकरुंसाठी मोकडे करुन तेथे त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा आणि मनपा आयुक्त विपिन पालिवाल यांना केल्या आहे. चैत्र महिण्यात भरणाऱ्या महाकाली यात्रेला सुरवात झाली असुन यात्रा अंतिम टप्यात पोहोचली आहे. त्यामुळे राज्यासह राज्या बाहेरील लाखो भाविक माता महाकालीच्या दर्शनासाठी चंद्रपूरात दाखल झाले आहे. यावेळी प्रशासनाच्या वतीने यात्रा परिसरात यात्रेकरुंची सोय करण्यात आली आहे. येथे येणा-या श्रध्दाळुंसाठी प्रशासनाच्या वतीने योग्य उपाययोजना करण्यात याव्यात यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी येथील व्यवस्थेची पाहणी सुध्दा केली आहे.

दरम्यान आज चंद्रपूरात वादळी पावसाला सुरवात झाली आहे. त्यामुळे यात्रेकरुंसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेता आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा आणि मनपा आयुक्त विपिन पालिवाल यांना मंदिर परिसरातील सभागृहे आणि मंगल कार्यालय यात्रेकरुंसाठी मोकडे करत येथे त्यांच्या निवासाची सोय करण्याच्या सुचना केल्या आहेत. सोबतच वातावरणातील बदलामुळे अनेक श्रध्दाळुंची प्रकृती खराब झाली आहे. त्यामुळे येथील रुग्णालय 24 तास पुर्ण क्षमतेने सुरु ठेवत येथे पुर्ण डॉक्टर उपलब्ध ठेवण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. यात्रेकरुंसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्याच्या सुचनाही यावेळी त्यांनी प्रशासनाला केल्या आहे.



# यंग चांदा ब्रिगेडच्या मध्यस्थीनंतर 'त्या' कामगारांचे थकीत वेतन मिळाले

## कामगारांनी मानले आ. किशोर जोरगेवार यांचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लॉयड्स मेटल कंपणी अंतर्गत कार्यरत  त्री विक्रम या कंपणीने येथील कामगारांचे एक महिण्याचे वेतन थकीत ठेवले होते. याची तक्रार यंग चांदा ब्रिगेडच्या घुग्घूस कार्यालयात प्राप्त होताच यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी आमदार किशोर जोरगेवार यांना माहिती दिली त्यानंतर आ जोरगेवार यांनी कंपणी व्यवस्थापनाशी संपर्क साधत कामगारांचे थकीत वेतन मिळवून दिले आहे. त्यामुळे कामगारांनी आमदार किशोर जोरगेवार आणि यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांचे आभार मानले आहे. लॉयड्स मेटल कंपणीत त्री विक्रम नामक कंपणी कार्यरत होती. सदर कंपणी अंतर्गत अनेक कामगार काम करत होते. मात्र या कंपणीने काम बंद केले. त्यांनतर लकी कंपणीला सदर कंपणीचे काम देण्यात आले. मात्र लकी कंपणीने जुने कामगार बंद करुन नवीन कामगारांना कामावर घेलते. त्यामुळे त्री विक्रम कंपणीतील कामगारांचे एक महिण्याचे वेतन थकीत राहिले. कामगारांनी कंपणी व्यवस्थापणाची संपर्क केला मात्र त्यांना अपेक्षित असा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या सर्व कामगारांनी यंग चांदा ब्रिगेडच्या घुग्घुस जनसंपर्क कार्यालयात संपर्क करत आपली व्यथा मांडली. सदर विषय समजुन घेत यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी या विषयाची माहीत आमदार किशोर जोरगेवार यांना दिली त्यांनतर आ. किशोर जोरगेवार यांनी त्री विक्रम कंपणीच्या व्यवस्थापणाशी संपर्क साधत कामगारांचे थकीत वेतन तत्काळ अदा करण्यास सांगीतले. त्यांनतर कंपणी व्यवस्थापणाने सर्व कामगारांचे एक महिण्याचे थकीत वेतन अदा केले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर